# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मलनि:सारण वाहिनी व गटार स्वच्छतेचे काम करणाऱ्या कामगारांचा होत असलेला मृत्यू**

**(१) ६३४ (०३-०४-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलनि:सारण वाहिनी व गटार स्वच्छतेचे काम करणाऱ्या कामगारांचे अपघात होऊन मृत्यू होत असल्याचे तसेच अशा घटना थांबविण्याकरिता करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची मदत तीस दिवसांच्या आत करण्याचे नियोजन व उपाययोजना शासन करणार आहे काय,

(३) असल्यास, खासगी गृहनिर्माण संस्था व इमारती येथे काम करीत असतांना होणाऱ्या दुर्घटनेची जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई व त्याच गृहनिर्माण संस्थेवर किंवा इमारत धारकांवर भरपाई देण्याचे नियोजन शासनाकडून करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१२-०२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. दुषीत गटारांमध्ये काम करीत असतांना कामगारांचा अपघात होऊन मृत्यु होत असल्याच्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र ५८३/२०३ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयानुसार सन १९९३ पासून सफाई कामगार/मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सचे काम करतांना मृत्यु पावलेल्या कामगारांच्या कुटूंबांचा शोध घेऊन अशा मृत्यु पावलेल्या कामगारांवर अवलंबून असणाऱ्या कुटूंबातील सदस्यांना रु.१० लाख नुकसान भरपाई अदा करण्यासाठी शासनाने दिनांक १२/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये सक्षम प्राधिकारी (जबाबदार अधिकारी) निश्चित

केले असून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयानुसार मृत्यु पावलेल्या कामगारावर अवलंबून असणाऱ्या कुटूंबातील सदस्यांना रु.१० लाख नुकसान भरपाई देणेबाबत सर्व संबंधितांना सूचित करण्यात आलेले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जबरानजोतांचे वनहक्काचे दावे फेटाळल्याबाबत**

**(२) १७६२ (०३-०४-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जबरान जोतांचे वनहक्कांचे २ लाखांवर दावे फेटाळण्यात आले आहेत, हे खरे आहे का?

(२) सन २००६ मध्ये वनहक्काचा कायदा आल्यानंतर त्यांना मालकी हक्क देण्याचे शासनाचे आदेश असूनही वनहक्काचे दावे फेटाळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, १५ हजारांवर दावे अजुनही प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनस्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) सदरहू दावे लवकरात लवकर निकालात काढण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. के.सी.पाडवी (०२-०३-२०२१) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्यात माहे जानेवारी, २०२१ अखेर जिल्हा स्तरीय समित्यांनी १८७६९३ वैयक्तिक दावे व ७९८६ सामुहिक दावे अंतिमत: मान्य केलेले आहेत तसेच ५०३३३ वैयक्तिक दावे व ३३३ सामुहिक दावे अंतिमत: अमान्य केले आहेत.

(२) दावेदाराने दाव्यासोबत १३ डिसेंबर,२००५ पूर्वीपासून वन जमिनीवरील अतिक्रमणाबाबतचा पुरावा जोडलेला नसणे, दावेदार बिगर आदिवासी असल्यास वन जमिनीवरील अतिक्रमणाबाबत दावेदाराने दाव्यासोबत तीन पिढ्यांपूर्वीचा पुरावा जोडलेला नसणे, वनविभागाच्या नोंद अभिलेखामध्ये दावेदाराच्या नावे वनजमिनी वरील अतिक्रमणाबाबत वन गुन्हा नोंद नाही, वनहक्क अधिनियमातील नियम १३ अन्वये सबळ पुरावे सादर न करणे, दावेदार वनजमिनीवर अवलंबून नसणे, मूळ दावेदारांनी वनहक्क दाखल केलेल्या प्रकरणांवरील जमिनींवर इतर दावेदाराने वनहक्क दावे दाखल करणे, दावा दाखल केलेली वनजमीन दावेदाराच्या ताब्यात नसणे या कारणास्तव वनहक्काचे दावे फेटाळण्यात आले आहेत.

(३) वनहक्क अंमलबजावणी करतांना दावेदारांवर अन्याय होऊ नये यासाठी वनहक्क दावेदारांना पुरावे जमा करण्यासाठी संधी देण्याकरिता तसेच दावेदारांच्या वनहक्क मागणी केलेल्या वनजमिनीबाबत स्थळनिरीक्षण करणे तसेच दावेदाराने सादर केलेल्या पुराव्यांबाबत खात्री करणेसाठी प्रलंबित दावे जिल्हास्तरीय समितीकडून उपविभागस्तरीय समितीकडे फेरतपासणीसाठी पाठविण्यात आलेली आहेत.

(४) सन मे, २०१८ पासून प्रलंबित दावे निकाली काढण्याकरिता वनमित्र मोहिम राबविण्यात आली असून सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना नियोजनबध्द कार्यक्रम राबवून प्रलंबित दावे

निकाली काढण्याबाबत आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांचेकडून सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच प्रलंबित दाव्यांबाबत दर आठवडयाला सचिव, आदिवासी विकास यांच्या स्तरावर आढावा घेण्यात येत असून दि.२०.१०.२०२० रोजीच्या अ.शा.पत्रान्वये प्रलंबित दाव्यांचा तातडीने निपटारा करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**चंद्रपूर जिल्हयातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३) २८१५ (०३-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सुमारे ८० टक्के उद्योग विविध कारणाने बंद असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील पंप ऑपरेटर / प्लंबरचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरचे बंद झालेले उद्योग पुन्हा सुरु करुन तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२३-०२-२०२१) :** (१) चंद्रपूर जिल्हयामध्ये डिसेंबर, २०१९ अखेरपर्यंत २७४२४ उद्योग नोंदणीकृत आहे. सन २००८ चे उद्योग प्रगणनेनुसार २७१ उद्योग बंद आढळून आले होते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर बाबतीत मा.विधानसभा सदस्य यांनी दिलेल्या निवेदन व सहपत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करुन संबंधितांना आवश्यक माहिती दिली आहे.

(४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक ६ मे, २०१६ अन्वये पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या व बंद उद्योग घटकांसाठी "विशेष अभय योजना" राबविण्यात आली. सदर योजनेचा कालावधी दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत होता.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ अन्वये राज्यात औद्योगिक गुंतवणूक वाढीसाठी व रोजगार निर्मितीसाठी "सामुहिक प्रोत्साहन योजना" राबविली जात आहे. नवीन उद्योग सुरु करणाऱ्या तसेच उद्योगांचे विस्तारीकरण करणाऱ्या पात्र उद्योग घटकांना या योजनेंतर्गत प्रोत्साहने देण्यात येतात. या योजनेचा कालावधी दिनांक १ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३१ मार्च, २०२४ आहे.

नवीन उद्योग / व्यवसाय स्थापित करु इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी उद्योग विभागामार्फत CMEGP व PMEGP या स्वयंरोजगार विषयक योजना राज्यात राबविण्यात येतात. सदर योजनांतून चंद्रपूर जिल्हयातील CMEGP योजनेत सन २०१९-२० अंतर्गत ३६

प्रकरणांना बँकेद्वारे मंजुरी दिली असून, PMEGP योजनेत ३४ प्रकरणे बँकेद्वारे मंजूर झाली आहेत. सन २०२०-२१ अंतर्गत १३ प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखाने, सुतगिरणी तसेच दुधसंघ या संस्थेमधील नोकर भरतीत प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याबाबत**

**(४) ३८५३ (०३-०४-२०२०). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखाने, सुतगिरणी तसेच दुधसंघ अशा ४४ मोठ्या संस्थातील नोकर भरतीत ५ टक्के प्रमाणे प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्यात पुर्नवसन कायद्याचा भंग झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर संस्थातील वर्ग ३ आणि ४ च्या एकूण पदामध्ये ५ टक्के जागावर प्रकल्पग्रस्त बेरोजगारांना संधी देणे पुर्नवसन कायद्यानुसार बंधनकारक असताना सहकारी संस्थामध्ये राजकीय नेते व कार्यकर्ते यांच्या कुटुबिंयाना उक्त भरतीत प्राधान्य दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०२-०३-२०२१) :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्हयामध्ये एकूण १६ सहकारी साखर कारखाने कार्यरत आहेत. सदर संस्थेमध्ये नोकर भरतीबाबतची प्रक्रिया कारखान्याच्या स्टाफिंग पॅटर्न व पोटनियमातील तरतुदींनुसार कारखाना स्तरावरच राबविण्यात येते.

कोल्हापूर जिल्हयामध्ये १४ उत्पादनाखाली, ०५ बंद व अवसायनात १२ अशा एकूण ३१ सूतगिरण्या आहेत. सदर संस्थेमध्ये नोकर भरती ही प्रकल्प अहवालानुसार जाहिराती सूतगिरण्यामार्फत देऊन भरती केली जाते.

दुधसंघाने त्यांच्या आस्थापनेवरील वर्ग-३ व ४ मधील एकूण पदामध्ये प्रकल्पग्रस्तांना ५% पदे राखीव ठेवण्याबाबतचे प्रकरण विभागीय आयुक्त यांच्याकडे न्यायप्रविष्ठ आहे. शिरोळ तालुका सह दुध व्यव.व कृषी पुरक सेवा संघ मर्यादित या संघाने त्यांचेकडे एकच कर्मचारी कार्यरत असलेबाबत कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील कलम ६ (अ) व (ब) मधील तरतूदीनुसार अशा संस्थांच्या आस्थापनावर वर्ग-३ व वर्ग-४ प्रवर्गातील सेवांमध्ये बाधित व्यक्तींच्या नामनिर्देशीतांकरीता किमान ५ टक्के प्राथम्य कोटा आहे. तथापि, सहकारी साखर कारखान्यामध्ये नोकर भरतीची प्रक्रिया ही सदर कारखान्याच्या स्तरावर राबविण्यात येते. आतापर्यंत प्रकल्पग्रस्त बेरोजगार १५५ कामगारांना साखर कारखान्यांनी नोकरीत सामावून घेतले आहे.

सहकारी सूतगिरण्यांमध्ये वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील पदामध्ये प्रकल्पग्रस्त बेरोजगारांना ५% प्रमाणात संधी देण्यात येतात.

तसेच, कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ (गोकुळ) यांच्याकडील भरती प्रक्रिये संदर्भातील बाब विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे न्यायप्रविष्ठ आहे.

(३) उक्त नमूद सहकारी संस्थांमध्ये वर्ग-३ व ४ संवर्गातील पदांमध्ये पुनर्वसन कायदयातील तरतूदीनुसार भरती करण्यांत येत नसल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इगतपुरी येथील भूमिअभिलेख कार्यालय यांचेकडून बाजार समितीने मोजणी करुन घेतलेल्या नकाशा मध्ये आढळून आलेल्या त्रुटीबाबत**

**(५) ४६५२ (२५-०३-२०२०). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :**सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी येथील भूमी अभिलेख कार्यालयाकडून दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास बाजार समितीने मोजणी करुन घेतली असता मोजणी कामाकरीता बाजार समितीने सादर केलेला नकाशा व इतर कागदपत्राचा कुठलाही विचार न करता भूमी अभिलेख कार्यालय इगतपुरी येथील मोजणी कर्मचारी यांनी दि. २ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास बाजार समितीने सादर केलेला नकाशात श्री. गिते यांना चुकीच्या पध्दतीने हद्दीखुणा दाखविल्या असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हद्दी खुणांच्या आधारे श्री. गिते यांनी रात्रीच्या वेळी पत्रे ठोकून शेतकरी व व्यापारी यांना यार्डवरील जागेचा वापर करण्यास प्रतिबंध केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकारास इगतपूरी भूमि अभिलेख कार्यालयातील शासकीय अधिकारी जबाबदार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकारी यांचेवर व इतर संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२६-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४), (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गडचिंचले (ता. डहाणू, जि. पालघर) येथे दोन साधूंसह त्यांच्या वाहन चालकाची झालेली सामूहिक निर्घृण हत्या**

**(६) ८८६८ (२९-०५-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती श्वेता महाले (चिखली),**

**श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गडचिंचले (ता. डहाणू, जि. पालघर) येथे कल्पवृक्षगिरी उर्फ चिकणे महाराज तसेच त्यांचे शिष्य सुशीलगिरी महाराज हे दोन साधू व त्यांचे वाहन चालक निलेश तेलंगरे अशा तिघांची चोर असल्याच्या संशयाने ग्रामस्थांच्या जमावाने पोलिसांच्या उपस्थित सामूहिक निर्घृण हत्या केल्याची घटना दिनांक १६ एप्रिल २०२० रोजी घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू हत्याकांड दिनांक १६ एप्रिल, २०२० रोजी घडलेले असताना याप्रकरणी एफ आय आर (F.I.R.) अशिराने म्हणजे दिनांक १८ एप्रिल, २०२० रोजी नोंदविण्यात आला असून सदर घटना पोलिसांच्या समोर घडली असून या प्रकरणी कासा पोलिसांनी ११० जणांना अटक केली आहे तसेच याबाबतचा तपास सीबीआयकडे वर्ग करून सर्व संबंधित दोषीं विरोधात विनाविलंब कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी मा. मुख्यमंत्री, मा. गृहमंत्री आदींकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घटनास्थळी पोलीस शस्त्रानिशी उपस्थित असताना व तेथील सरपंच चित्रा चौधरी यांनी काही तास जमावाचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करून दोन साधू व त्यांचे वाहन चालकास रात्री ९.०० वा. च्या सुमारास पोलिसांच्या वाहनात बसवून त्यांची सुरक्षा करण्याबाबत सूचित करूनही पोलिसांनी त्यांची सुरक्षा करण्याबाबत कोणतीही काळजी न घेता उलट या तिघांना जमावाच्या स्वाधीन केले तसेच घटनेच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये काही स्थानिक प्राधिकरण संस्थांचे पदाधिकारी व काही राजकीय पक्षांचे कार्यकर्ते सक्रीय असल्याचे दिसून येत असल्याने शासनाने तात्काळ त्यांची नावे व पत्ते जाहीर करून त्यांचे विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर हत्याकांड घडण्याआधी डहाणू तालुक्यासह धामनविरा, कोटला, सायवन, कैनाड, ब्राह्मणवाडा तसेच बार्डी परिसरात अनेक दिवसांपासून, लहान मुलांच्या किडण्या काढण्यासाठी आणि लुटण्यासाठी चोर, दरोडेखोर फिरत असल्याच्या अफवेमुळे आदिवासी बहुल भागातील लोकांच्या हातून काहीतरी विपरीत घडण्याआधी समाज प्रबोधन करून त्यांचे मतपरिवर्तन करणे अत्यंत आवश्यक आहे, असा इशारा कष्टकरी संघटनेने तहसीलदार, डहाणू तसेच कासा पोलिसांना दिलेला असतानाही इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे ही अमानुष घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी शासनाने केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी आढळलेल्या पोलिसांवर व अटक करण्यात आलेल्या ११० जणांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२६-०२-२०२१) :** (१) दि.१६.०४.२०२० रोजी श्री.आनंदराव काळे, सहायक पोलीस निरिक्षक हे कासा पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकारी म्हणून कर्तव्यावर असताना गडचिंचले, चौकीपाडा येथे मोठा जमाव जमला असून त्या जमावातील लोकांनी एक पांढ-या रंगाची गाडी रोडलगत पलटी करुन टाकली आहे. जमा झालेले लोक त्या गाडीमधील तीन इसमांना मारहाण करीत आहेत असा फोन आल्याने श्री.काळे हे त्यांच्या स्टाफसह गडचिंचले चौकीपाडा येथे घटनास्थळी येऊन जामावाला पांगविण्याकरीता आवाहन करीत असताना जमाव हिंसक होऊन त्यांनी पोलीस वाहनांवर दगडफेक केली. जमावाने गाडीतील सुशिलगिरी महाराज व त्यांचे वाहनचालक निलेश तेलंगडे व गाडी बाहेर असलेले कल्पवृक्षगिरी उर्फ चिकणे महाराज यांना शिवीगाळ करुन मारहाण केली.त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला.

(२) गुन्हा नोंदविण्यास विलंब झाला हे खरे नाही.

कासा पोलीस ठाणे येथे दिनांक १७.०४.२०२० रोजी २२.५८ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु नेटवर्क कनेक्टीव्हीटी नसल्यामुळे सीसीटीएनएस प्रणालीमध्ये सदर गुन्हयाची दाखल तारीख दिनांक १८/०४/२०२० रोजी ६.५९ वाजता अशी आहे. सदर गुन्हयात १०१ आरोपी व ०९ विधीसंघर्ष बालक यांना दिनांक १७/०४/२०२० रोजी ताब्यात घेवून त्यांना कासा पोलीस ठाणे येथे आणून १०१ आरोपी यांना दिनांक १८/०४/२०२० रोजी रात्रौ २.२७ वाजता तपासकामी अटक करुन ०९ विधीसंघर्ष बालक यांना बाल न्यायमंडळ भिवंडी येथे ठेवण्यात आले होते. कासा पोलीस ठाणे येथे दिनांक १७.०४.२०२० रोजी गुन्हा दाखल करुन त्याच दिवशी ११० आरोपींना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले. सदर प्रकाराबाबत दाखल गुन्हयाचा तपास अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला असून त्यांनी कासा पोलीस ठाणे जि. पालघर गु.र.क्र. ७६/२०२० या गुन्हयामध्ये १२६ आरोपीतांविरुध्द व गुरक्र ७७/२०२० या गुन्हयामध्ये १२६ आरोपीतांविरुध्द दोषारोपपत्र मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकरी डहाणू यांचे न्यायालयात दिनांक १५/०७/२०२० रोजी नियत कालावधीत दाखल केले आहे.

तथापि, प्रकरणाचा तपास सी.बी.आय. कडे वर्ग करुन सर्व संबंधित दोषीं विरोधात विनाविलंब कारवाई करण्यात यावी अशी मागणी मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद व अन्य विविध संस्थांनी शासनाकडे केली आहे.

(३) मयत दोन साधुसंतासह त्यांचे वाहन चालक या तिघांना पोलीसांनी जमावाच्या स्वाधीन केले ही बाब खरी नाही.

कासा पोलीस ठाण्याचे तत्कालिन प्रभारी अधिकारी सपोनि आनंदराव काळे हे त्यांच्या स्टाफसह घटनास्थळी येवुन जमावाला पांगविण्याचा प्रयत्न करित होते. तरीही जमावाने हिंसक होऊन पोलीसांच्या वाहनांवर दगडफेक केली. तसेच जमावाने सुशीलगिरी महाराज व त्यांचे वाहन चालक निलेश तेलंगडे व गाडी बाहेर बसलेले कल्पवृक्षगिरी ऊर्फ चिकणे महाराज यांना शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यात त्यांचा मृत्यू झाला.

घटनास्थळावर स्थानिक स्वराज्य संस्थेचे काही प्रतिनिधी हे प्रक्षुब्ध जमावास समजावण्याचा व शांत करण्याचा प्रयन्त करत असल्याचे व पोलीसांना मदत करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(४) डहाणू तालुक्यात ग्रामीण भागात चोर आले असल्याची अफवा पसरवल्याची बाब खरी

आहे. त्यानुषंगाने सहायक पोलीस निरीक्षक, कासा पोलीस ठाणे यांनी त्यांचे पत्र क्र. १५७७/२०२०, दि. १५.०४.२०२० अन्वये कासा पोलीस ठाणेच्या हद्दीतील काही गावात चोर आले असल्याची अफवा पसरवली असल्याचे तहसिलदार, डहाणू यांना कळविलेले होते. कासा पोलीस ठाण्याचे वतीन सर्व गावांनी अफवा पसरवु नये म्हणून सर्व नागरीकांना घरी राहण्याबाबत आवाहन करण्यात येत होते. तहसिलदार, डहाणू यांनी पत्रान्वये अफवाबाबत गावातील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, तलाठी, पोलीस पाटील यांनी एकत्र येऊन गावातील ग्रामस्थांमध्ये पसविलेल्या अफवाबाबत जनजागृती करुन त्यांच्या मनात सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करणेबाबत सर्व ग्रामसेवक / तलाठी यांना सूचित केले होते.

(५) कासा पोलीस ठाणे येथे दिनांक १७.०४.२०२० रोजी गुन्हा दाखल करुन त्याच दिवशी ११० आरोपींना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले होते. सदर गुन्हा शासनाच्या आदेशान्वये अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला असून त्यांनी कासा पोलीस ठाणे जि. पालघर गु.र.क्र. ७६/२०२० या गुन्ह्यामध्ये १२६ आरोपींविरुध्द व गु.र.क्र. ७७/२०२० नुसार दाखल गुन्ह्यामध्ये १२६ आरोपींविरुध्द मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकरी डहाणू यांचे न्यायालयात दिनांक १५/०७/२०२० रोजी नियत कालावधीत दोषारोपपत्र दाखल केले आहे. सदर गुन्ह्याचा तपास अद्याप सुरु असून अटक आरोपींविरुध्द विहित वेळेत दोषारोप पत्र दाखल करण्याची तजविज ठेवली आहे.

तसेच सदर प्रकरणामध्ये दोषी पोलीस अधिकरी व कर्मचारी यांचेवर पुढील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

कासा पोलीस ठाण्याचे तत्कालीन सहायक पोलीस निरिक्षक तथा प्रभारी अधिकारी यांना दिनांक २१/०८/२०२० रोजी शासन सेवेतून बडतर्फ ही शिक्षा देण्यात आली आहे. तसेच एका पोलीस उपनिरिक्षकाला पोलीस उप निरीक्षक पदाच्या वेतन श्रेणीतील मुळ वेतनावर ०२ वर्ष ठेवणे ही शिक्षा देण्यात आली आहे. तसेच १ सहायक पोलीस उपनिरिक्षक व १ पोलीस हवालदार यांना सक्तीने सेवानिवृत्त ही शिक्षा देण्यात आली आहे. तसेच १ पोलीस हवालदार यांना पोलीस हवालदार पदाच्या वेतन श्रेणीतील मुळ वेतनावर २ वर्ष ठेवणे ही शिक्षा व ३ पोलीस शिपाई यांना पोलीस शिपाई पदाच्या वेतनश्रेणीतील मुळ वेतनावर १ वर्ष ठेवणे ही शिक्षा देण्यात आलेली आहे. तसेच १० पोलीस शिपाई यांना पोलीस शिपाई पदाच्या मूळ वेतनावर ३ वर्ष ठेवणे ही शिक्षा देण्यात आलेली आहे.

वरील कसूरदार यांना दिनांक २६.०८.२०२० रोजी अंतिम शिक्षेचे आदेश बजावण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भभवत नाही.

---

**खेड, जुन्नर, आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील मुख्यमंत्री सौर कृषी पंप जोडणीच्या प्रलंबित अर्जाबाबत**

**(७) ११४३६ (१३-०९-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड, जुन्नर, आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील दुर्गम भागात व लांब पल्ल्याच्या शेतांना वीज जोडणी देण्यासाठी शासनाकडून मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी विज वितरण कंपनीकडे पुणे जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांनी अर्ज दाखल केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावांपैकी किती प्रस्ताव मंजूर करण्यात आले व किती अपात्र ठरविण्यात आले आहेत,

(४) असल्यास, मंजूर प्रस्तांवापैकी केवळ मर्यादित शेतकऱ्यांना सौर कृषी पंपाचा लाभ देण्यात आला असून उर्वरित पात्र शेतकरी सौर कृषी पंपासाठी पैसे भरूनही त्यांना कृषीपंप देण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतकऱ्यांना कृषीपंप अद्याप न मिळण्याची कारणे काय आहेत, तसेच कृषीपंप मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०२-०३-२०२१) :** (१) राज्यात शेतक-यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे यासाठी शासनाने दि.१५.११.२०१८ च्या शासन निर्णयानुसार पारेषण विरहीत सौर कृषीपंप देण्याकरीता मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत १ ल्या टप्प्यात २५००० आणि २ ऱ्या व ३ ऱ्या टप्प्यात ७५००० असे एकूण १,००,००० सौर कृषीपंप महावितरण या अंमलबजावणी यंत्रणेमार्फत आस्थापित करण्यास मान्यता देण्यात आली.

(२) व (३) या योजनेंतर्गत पुणे जिल्हयातून एकूण ४१५७ अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी २०७६ अर्ज मंजूर करण्यात आले असून विविध कारणास्तव १६५७ अर्ज अपात्र ठरलेले आहेत. उर्वरीत अर्ज कार्यवाहीसाठी प्रलंबित आहेत.

(४) मंजूर २०७६ अर्जदारांपैकी १३८९ लाभार्थी शेतक-यांनी मागणी पत्राचा भरणा केलेला असून १३४३ लाभार्थ्यांनी पुरवठादारांची निवड केली आहे. त्यापैकी ९५६ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आलेले असून उर्वरित कामे माहे मार्च, २०२१ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) राज्य शासनाद्वारे दि.१.४.२०१८ नंतर कृषी पंपासाठी अर्ज केलेल्या अर्जदारांसाठी दि.१८.१२.२०२० रोजी कृषीपंपासाठीचे धोरण जाहीर करण्यात आले आहे.

---

**अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना निकृष्ट दर्जाच्या धान्याचे विवरण होत असल्याबाबत**

**(८) ११४८२ (१६-०९-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना आजाराचा संसर्ग टाळण्यासाठी लॉकडाऊन आणि संचारबंदीच्या काळात शासनाच्या आदेशानुसार सर्वसामान्य व मध्यमवर्गीय यांना दिलासा देण्यासाठी केशरी कार्डधारकांना स्वस्त धान्य दुकानातून माहे एप्रिल, मे व जून २०२० या तीन महिन्यात गहू-तांदूळ या धान्यांचे वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना निकृष्ट दर्जाचे धान्य वितरीत करण्यात येत असल्याच्या तसेच सदर धान्य खुल्या बाजारात विकून दुकानदारांकडून धान्याचा अपहार होत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने राज्यातील किती स्वस्त धान्य दुकाने व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (२५-०२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या तसेच शेतकरी योजनेत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना माहे मे ते ऑगस्ट, २०२० या चार महिन्याच्या कालावधीकरिता सवलतीतील अन्नधान्याचा लाभ देण्यात आला आहे.

(२) होय. हे खरे आहे.

राज्यात काही ठिकाणी रास्तभाव दुकानात निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य प्राप्त झाल्याच्या तसेच काही दुकानदारांकडून अन्नधान्याचा अपहार होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३) निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर प्रथम दुकानदारांना धान्य बदलून देण्यात आले व तद्नंतर लाभार्थ्यांना चांगल्या दर्जाच्या अन्नधान्याचे वितरण करण्यात आले आहे. दुकानदारांकडून अन्नधान्याचा अपहार होत असल्याच्या तक्रारीच्या तपासणीअंती राज्यात एकूण ७१ रास्तभाव दुकाने निलंबित करण्यात आली असून ९० रास्तभाव दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत, ५९ रास्तभाव दुकानांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ७८ दुकानांची १०० % अनामत रक्कम जप्त करण्यात आली असून २७ प्रकरणांमध्ये एकूण ₹ १,२१,१९६/- एवढी दंड आकारणी करण्यात आली आहे. तसेच १६ रास्तभाव दुकानदारांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील इमारतीचे पार्किंग क्षेत्राचे काम अपूर्णावस्थेत असताना भोगवटा पत्र देण्यात आल्याबाबत**

**(९) ११४८७ (१८-०९-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मंत्री इंटरनिटी सर्वे नंबर ४१०/१ व ४११/२ सिटी सर्वे नंबर २३०४ पैकी भोसरी कुंदननगर येथील गृह प्रकल्पातील "ए" इमारतीचे पार्किंग क्षेत्राचे काम अपूर्णावस्थेत असतानाही महानगरपालिकेच्यावतीने सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पातील अमेनिटी स्पेसची जागा नियमबाह्यरित्या बदलण्यात आली असून बीआरटी क्षेत्रासाठीचे पार्किंग महानगरपालिकेकडे हस्तांतरीत न करता भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एम एन जि एल एसटीपी मान्य नकाशाप्रमाणे न दर्शविता व जोते तपासणीचा दाखला न देता बिगर परवाना "ए", "बी" व "सी" इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जोते तपासणी दाखला न घेता केलेला बिगर परवाना बांधकाम दंड वसूल करण्यात आला नसल्याने मोठ्या प्रमाणावर महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकल्पातील बांधकाम व्यवसायिक व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०२१) :**(१), (२), (३), (४), (५) व (६) हे खरे नाही.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील भोसरी कुंदननगर येथील सर्व्हे क्र. ४१०/१ व ४११/२ सि.स.क्र.२३०४ पै. येथील मंत्री इंटरनिटी गृहप्रकल्पास दि.१४.०३.२०१२ रोजी महापालिकेने मुळ बांधकाम परवानगी दिली असून वेळोवेळी सुधारित बांधकाम परवानगी दिली आहे. "ए" इमारतीचे काम पूर्ण झाले असल्याने दि.२९.०७.२०१७ रोजी भाग पुर्णत्वाचा दाखल दिला आहे. तसेच नियमानुसार सुविधा क्षेत्र, नोंदणीकृत दस्ताद्वारे महापालिकेच्या ताब्यात देण्यात आले आहेत. "बी" व "सी" इमारतींसाठी भागश: पुर्णत्वाचा दाखल दिला आहे. सदर प्रकल्पातील "ए"+"बी" इमारतीसाठी दि.२.२.२०१३ व "सी" इमारतीसाठी दि.४.६.२०१४ रोजी जोते तपासणी दाखला दिला आहे. "ए"+"बी" इमारतीसाठी जोते तपासणी दाखला न घेता केलेल्या बांधकामासाठी महापालिकेने रु.३००००००/- एवढा दंड भरुन घेतलेला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील बी.आर.टी. कॉरीडॉरच्या नियमानुसार विकासकांनी सामासिक अंतर ९ मी. ठेवून त्यामधील ४.५० मी. सामासिक अंतर पार्किंगसाठी विकसित करुन महापालिकेस विना मोबदला हस्तांतरित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार विकासकांनी सुधारित बांधकाम परवानगी दि.२६.२.२०२० अन्वये महापालिकेस हस्तांतरित करावयाचे पार्किंग क्षेत्र नकाशात दर्शविले आहे. सदर प्रकल्पास पुर्णत्वाचा दाखला देण्यापूर्वी महापालिका सदरचे पार्किंग क्षेत्र विना मोबदला हस्तांतरित करुन घेणार आहे.

---

**राज्यातील बौद्ध समाजातील तरुणांना चुकीच्या नमुन्यातील जात प्रमाणपत्र दिले जात असल्याबाबत.**

**(१०) ११५१० (१३-०९-२०२०).ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने तयार केलेल्या आणि देशातील सर्व राज्यात लागू असलेल्या नमुन्यातच जातीचे प्रमाण द्यावे असे आदेश असतानाही महाराष्ट्रातील सामाजिक न्याय विभागाकडून येथील बौद्ध समाजातील तरुणांना चुकीच्या नमुन्यातील जात प्रमाणपत्र दिले जात असल्याचे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे केंद्र सरकारच्या माध्यमातून विविध क्षेत्रात मिळत असलेल्या सवलती राज्यातील बौद्ध समाजातील तरुणांना मिळत नसल्याची आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून प्रश्न सोडविण्यासाठी मंत्रालयीन अधिकाऱ्यांसमवेत संबंधित लोकप्रतिनिधीं सोबत बैठक घेण्याचे मा. सामाजिक न्याय मंत्री यांनी आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन राज्यातील बौद्ध समाजातील तरुणांना केंद्र सरकारने तयार केलेल्या विहित नमुन्यातच जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-०२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

सन १९५० च्या केंद्र शासनाच्या आदेशानुसार केवळ हिंदू व शीख धर्मियांना अनुसूचित जातीचे समजले जात होते. अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतरितांना अनुसूचित जातीच्या सवलती महाराष्ट्र शासनाने लागू केल्या होत्या व त्याबाबतचा नमुना १९६२ पासून विहित केला होता.

अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतरितांना केंद्र शासनाच्या सवलती मिळण्याकरिता केंद्र शासनाने संविधान (अनुसूचित जाती) आदेश (सुधारणा) कायदा, १९९०, दिनांक ३ जून, १९९० अन्वये सुधारणा केली व अनुसूचित जातींची यादी हिंदू, शीख व बौध्द धर्मियांना लागू केली.

राज्य शासन राज्यातील अनुसूचित जातीतील धर्मांतरित बौध्दांना राज्य शासनाच्या सवलती देत असल्याने राज्याच्या नमुन्यात धर्माचा उल्लेख पूर्वीपासूनच आहे. मात्र केंद्राच्या नमुन्यात याबाबत राज्याने विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे सुधारणा करण्याची केंद्राला विनंती करण्यात आलेली होती. मात्र ती अद्यापपर्यंत मान्य झालेली नाही.

या प्रकरणी विधीमंडळाच्या झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने दरम्यान सदर प्रश्न सोडविण्यासाठी मंत्रालयीन अधिकाऱ्यांसोबत संबंधित लोकप्रतिनिधींची बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. तथापि, मार्च-२०२० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन कोविड-१९ या साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर लवकर संपविण्यात आले व त्यानंतर लॉकडाऊनमुळे बैठक होऊ शकलेली नाही. याबाबत राज्य शासन लवकरच बैठक आयोजित करण्याची तजवीज करीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा तथा तालुकास्तरावरील पाणी व स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत**

**(११) ११६०० (०८-०९-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा तथा तालुकास्तरावरील पाणी व स्वच्छता विभागातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पदे बाह्यस्रोतद्वारे भरण्याबाबत कार्यवाही सुरू असून अशी भरती झाल्यास मागील पंधरा ते वीस वर्षापासून काम करणारे कंत्राटी कर्मचारी बेरोजगार होतील यासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती बाह्यस्रोतद्वारे करण्यात येऊ नये अशी मागणी महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी महासंघ यांनी माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२३-०२-२०२१) :** (१) होय.

(२) राज्य मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक ०४.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात जल जीवन मिशन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या शासन निर्णयात मिशनकरिता आवश्यक मनुष्यबळ बाह्ययंत्रणेद्वारे घेण्याची तरतुद आहे.

शासन पत्र दिनांक २७ जुलै, २०२० व दिनांक ०३ ऑगस्ट, २०२० रोजीच्या आदेशाविरुद्ध राज्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी/ त्यांच्या संघटनांनी मा. उच्च न्यायालयातील खंडपीठामध्ये या

याचिकांवरील न्यायालयाच्या आदेशानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवेस न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लॉकडाऊन च्या काळात असंघटित कामगाराना आर्थिक मदत देण्याबाबत.**

**(१२) ११७२१ (१५-०९-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.योगेशदादा कदम (दापोली), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना मुळे शासनाला लॉकडाऊन करावे लागले, असल्यामुळे रिक्षा व्यवसायिक, केशकर्तनालय व्यवसायिक, लहान स्वरुपातील खानावळ इत्यादी लहान व्यवसायिकांचे तसेच शेतमजूर, कामगार, हमाल, घरकामगार इत्यादी असंघटित कामगाराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी त्यांना आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे दिनांक ११ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडे निवेदन प्राप्त झालेले नाही. मात्र, अशा स्वरुपाच्या मागण्यांची निवेदने या विभागाकडे प्राप्त झालेली आहेत.

(३) लॉकडाऊनच्या काळात राज्याचे महसूली स्त्रोत आटले असुन, या परिस्थितीत आरोग्य सेवा तसेच, कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित विभागांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देणे राज्य शासनास भाग पडत आहे. या परिस्थितीत, खर्चाचे प्राधान्यक्रम विचारात घेऊन, त्यानुसार निधी उपलब्ध झाल्यास, त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेणे शक्य होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील गैरव्यवहाराबाबत**

**(१३) ११७९४ (१४-०९-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या स्थापनेपासून सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षामध्ये अंशदान, कामगार नोंदणी व उपकार या माध्यमातून मंडळास प्राप्त झालेला कोटयवधी रूपयांचा निधी मंडळाने चालू (CURRENT ACCOUNT) खात्यात जमा केल्याने यावर बँकेकडून कोणतेही व्याज न मिळाल्याने मंडळाचे आर्थिक नुकसान झाले आहे, तसेच सन २००७-२००८ ते २०१५-२०१६ या ८ वर्षांच्या कालावधीत प्रशासकीय खर्चापोटी मंडळाने जवळपास १०१ कोटी इतका निधी खर्च केल्याचे मंडळाच्या सन २००७-२००८ ते २०१५-२०१६ च्या वार्षिक अहवालामधून निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या जाहिरातीकरिता सन २०१३ ते २०१५ या कालावधीत जवळपास ७६ कोटी रूपये खर्च केल्याचे व मंडळाकरिता उपकर वसुल करणाऱ्या आस्थापनांना २० कोटी १६ लाख ७१ हजार ७४५ रूपये देणे असल्याचे आणि मंडळाच्या बैठकांसाठी आवश्यक स्टेशनरी, प्रिंटींग, टेलिफोन खर्च, इंटरनेट शुल्क, इ. कारणांसाठी जवळपास ६५ लाख रूपये खर्च करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मंडळाकडे नोंदणी केलेल्या कामगारांना नोंदणी केल्यावर लगेच ५ हजार रूपयांची मदत देण्याची योजना मंडळाकडून सुरू ठेवण्यात आल्याने केवळ नामधारी कामगारांनी मंडळातील अधिकारी तसेच या बोगस कामगारांची नोंदणी करून घेणारे स्थानिक अधिकारी यांच्या संगनमताने या मंडळात स्वत:ची नोंदणी करून या ५ हजार रूपयांचा लाभ मिळवून शासनाची फसवणूक केली असून ही बाब लक्षात आल्याने मा.मंत्री महोदयांनी सदरहू योजना माहे फेब्रुवारी, २०२० पासून बंद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच या मंडळाच्या नियमातील नियम क्रमांक ९ (ब) नुसार विधानसभा व विधानपरिषद सभागृहातील प्रत्येकी एक याप्रमाणे दोन सदस्यांची या मंडळावर नियुक्ती करणे आवश्यक असताना मंडळाच्या स्थापनेपासून आजमितीपर्यंत या नियुक्त्या करण्यात आलेल्या नाहीत, हे ही, खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने शासनाची फसवणूक व दिशाभूल करणारे अधिकारी व मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(६) तसेच मंडळामार्फत आतापर्यंत करण्यात आलेला कोटयवधी रुपयांचा खर्च, बोगस कामगारांची नोंदणी याबाबत मंडळाची भूमिका ही संदिग्ध असून शासनाच्या कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार झाल्याची शक्यता असल्याने या मंडळाच्या स्थापनेपासून आजमितीपर्यंत या मंडळामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीची व खर्चाची सर्वंकष चौकशी करण्यासाठी शासनाने चौकशी समितीची नियुक्ती केली आहे वा करण्यात येणार आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१२-०२-२०२१) :** (१) सन २००७-२००८ ते सन २०१०-११ या आर्थिक वर्षामध्ये रुपये ९८,१२,४६,०२८/- इतका निधी मंडळाच्या चालू खात्यामध्ये जमा होता. सन २०११-२०१२ पर्यंत मंडळामार्फत विविध राष्ट्रीयकृत बँकात गुंतवणूक केलेल्या मुदत ठेवीवरील व्याज रक्कम रु.२१,५६,७६,५३७/-एवढी आहे व बांधकाम कामगारांच्या नोंदणी शुल्कावरील व्याज रक्कम रु.३७,९२१/- एवढी आहे. असे एकूण रक्कम रु. २१,५७,१४,४५८/- व्याज जमा झालेले आहे.

तसेच सन २००७-२००८ ते २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रशासकीय खर्चापोटी रुपये १००,७७,०६,८११/- करण्यात आलेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या जाहिरातीकरिता सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ मध्ये रुपये ७५.१७ कोटी खर्च करण्यात आलेला आहे. सन २०१२-२०१३ ते २०१४-२०१५ मधील उपकर वसूल करणाऱ्या आस्थापनांची परतावा रक्कम रुपये २२.४७ कोटीची तरतूद सन २०१४-२०१५ च्या लेख्यामध्ये करण्यात आलेली आहे.

सन २०१३-२०१४ ते २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात लेखांकन शुल्क, लेखापरिक्षण आकार, बँक आकार, मंडळ सदस्य बैठक आकार आणि भत्ते, बैठकीसाठीचा खर्च प्रिंटिग, स्टेशनरी, टेलिफोन खर्च, इंटरनेट शुल्क, प्रशासकीय खर्च करीता रुपये ९०.१६ लाख खर्च करण्यात आलेला आहे.

(३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.१३ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या ५३ व्या बैठकीत बांधकाम कामगारांसाठी उपयुक्त /आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरिता रु.५०००/- चे अर्थसहाय्य ही योजना बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर ठरावास शासनाने दिनांक १४ ऑगस्ट, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

(४) होय, हे खरे आहे.

तथापि, महाराष्ट्र विधानमंडळाच्या दिनांक २८.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये सल्लागार समितीवर विधानमंडळ प्रतिनिधी निवडीची कार्यवाही स्वतंत्रपणे सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातकणंगले (जि. कोल्हापूर) तालुक्यातील चांदी उद्योजक व कारागीर बेरोजगार झाल्याबाबत**

**(१४) ११७९६ (२०-०९-२०२०). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरानाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे चांदीच्या दरात चढ-उतार होत असल्याने हातकणंगले (जि. कोल्हापूर) तालुक्यातील चांदी उद्योगांमध्ये कोट्यवधींची होणारी उलाढाल ठप्प झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हुपरी येथील उद्योजक संपूर्ण देशात जाऊन चांदी दागिन्यांची विक्री करत असून, कोरोच्या संसर्गामुळे आपत्कालीन कायदा लागू झाल्याने त्याचा परिणाम येथील चांदी उद्योगावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील उद्योजक कारागीर व घरोघरी चांदी करणाऱ्या कामगारांवर बेरोजगाराची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चांदी उद्योगाला चालना मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०४-०३-२०२१) :** (१), (२) व (३) कोरोना विषाणू संसर्ग रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून राज्यातील अत्यावश्यक सेवा वगळता सर्वच उद्योग बंद करण्याचे निदेश शासन अधिसूचना दिनांक १४ मार्च, २०२० अन्वये दिले होते. त्यास अनुसरुन, राज्यातील अत्यावश्यक सेवा वगळता सर्वच उद्योग बंद करण्यात आले. तसेच अत्यावश्यक सेवा वगळता प्रवास करण्यावर बंदी घालण्यात आली.

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य व केंद्र शासनाने जाहीर केलेल्या लॉकडाऊन कालावधीमध्ये हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील चांदी उद्योग बंद होते. हुपरी येथील उद्योजक मोठया प्रमाणात चांदी उत्पादन व विक्री करतात. तथापि लॉकडाऊन असल्यामुळे दरम्यानच्या काळात चांदी विक्री करता आली नाही.

केंद्र शासनाच्या निदेशास अनुसरुन राज्यातील उद्योग टप्प्या टप्प्याने सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे. राज्यात व देशांतर्गत प्रवासास टप्प्या-टप्प्याने परवानगी देण्यात

आली आहे.
लॉकडाऊनच्या कालावधीत सदर उद्योगामध्ये काम करणारे कामगार परगावी निघून गेले. लॉकडाऊनचे निर्बंध शिथील केल्यानंतर कामगार रुजू झाले व उद्योग पूर्ववत सुरु झाले आहेत.
(४) चांदी उद्योगाचा विकास व्हावा म्हणून शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत कागल पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रामध्ये सिल्व्हर झोन निर्माण केला आहे. सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत सिल्व्हर झोनमधील एकूण गुंतवणूक रु.३४३२.०० लक्ष असलेल्या २७५ चांदी उत्पादक उद्योग घटकांना मुद्रांक शुल्क माफी देण्यात आली आहे.
नव्याने सुरु होणाऱ्या चांदी उद्योगांसाठी पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत ७५ घटकांना लाभ देण्यात आला आला आहे. या ७५ उद्योग घटकांची एकूण गुंतवणूक रु.१४८५.०० लक्ष असून, त्यामध्ये अनुदानाची रक्कम रु.४२५.०० लक्ष आहे.
केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत औद्योगिक समुह विकास योजनेमध्ये सिल्व्हर ऑर्नामेंट क्लस्टर, हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर या औद्योगिक समुहाचा प्रकल्प रु.१५००.००लक्ष चा असून, यामध्ये शासनाचे अनुदान रु.१३५०.०० लक्ष व एस.पी.व्ही. चा सहभाग रु.१५०.०० लक्ष आहे. या प्रकल्पामध्ये २०१ उद्योग घटकांचा समावेश असून, या उद्योग घटकांची क्षमता वाढविण्यासाठी क्षमता वृध्दी कार्यक्रम (तंत्रज्ञान वाढ, ट्रस्ट बिल्डींग, कॅपॅसिटी बिल्डींग, इ.) घेण्यात आले आहेत.

कोरोनाच्या संसर्गामुळे उद्योग / व्यवसाय बंद ठेवावे लागले असल्यामुळे दरम्यानच्या काळात उद्योगधंदयांची उलाढाल कमी झाल्यामुळे केंद्र शासनाने चांदी उद्योजकांना चालना देण्यासाठी आत्मनिर्भर योजनेंतर्गत लाभ देय केले आहेत.

कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्याकरीता केलेल्या लॉकडाऊनमुळे अडचणीत आलेल्या उद्योग घटकांना मदत करण्याच्या सूचना उद्योग संचालनालयाकडून सर्व जिल्हा बँक समन्वयक यांना देण्यात आल्या. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बँकर्स समितीमध्ये सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना प्राधान्याने शासनाच्या आत्मनिर्भर योजना अंतर्गत सहकार्य करण्याचे सूचित केले आहे. कोल्हापूर जिल्हयातील ७५ चांदी उद्योगांना सदर योजनेंतर्गत विविध बँकांनी मदत केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील मजूर संस्थांच्या कामाची देयके प्रलंबित ठेवल्याबाबत**

**(१५) ११९०५ (१९-०९-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील गौण खनिज निधी अंतर्गत काही मजूर संस्थांनी त्यांनी केलेल्या कामाची देयके सादर केली असता जिल्हाधिकारी, पालघर यांनी या देयकांसंदर्भातील गौण खनिज निधी वर्ग करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याचे माहे एप्रिल-मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोरोनाच्या संकटामुळे मागील तीन महिन्यांपासून टाळेबंदीमुळे संपूर्ण व्यवहार, व्यवसाय, उद्योग, कामे बंद असल्याने मागील आर्थिक विवंचनेत असणाऱ्या मजूर संस्थांची देयकाची रक्कम अदा न करण्याची व या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी दिरंगाई करण्याची कारणे काय आहेत,

(३) सदरहू देयकाची रक्कम अदा करण्याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांना वरिष्ठ स्तरावरून आदेश प्राप्त झाले असतांना देखील सदरहू देयके अदा करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त जिल्ह्यातील मजूर संस्थांनी केलेल्या कामाची देयक त्यांना अदा करण्याबाबत तसेच आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (११-०२-२०२१) :** (१) नाही.

पालघर (तत्का. ठाणे) जिल्ह्यातील कामांना मंजूरी हि सन २०११ मध्ये देण्यात आलेली असून खनिज विकास निधी अंतर्गत सन २०१६ पुर्वी प्रशासकिय मान्यता देण्यात आलेल्या तथा काम पुर्ण झालेल्या कामांना जिल्हा खनिज प्रतिष्ठानमधून निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनपत्र दिनांक १७.०४.२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे. तसेच नमूद मजूर संस्थाच्या कामांकरीता निविदापुर्व निधी १०% प्रमाणात वितरित करण्यात आलेला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) पालघर जिल्ह्याकरीता जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत कार्यकारी परिषदेवरील सदस्यांची नियुक्ती झाली नसल्यामुळे देयके अदा करण्यात आलेली नाहीत. सदस्यांची नियुक्ती होताच सदर देयके अदा करण्यात येतील.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील आंबा या फळाकरिता बाजारपेठ उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१६) १२१६५ (१४-०९-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणामध्ये घेतल्या जाणाऱ्या फळ पिकांपैकी आंबा हा जग प्रसिध्द आहे, परंतु आंबा विक्रीसाठी कोकण व उर्वरित महाराष्ट्रातील मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ येथे पणन महामंडळाच्या माध्यमातुन मोफत किंवा किमान शुल्क दर आकारुन तात्पुरत्या स्वरुपाचे व्यवसायिक गाळे उपलब्ध करुन देण्याबाबत शासन विशेष प्रयत्नशील नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन आंबा विक्रीसाठी तात्पुरत्या स्वरुपाचे व्यवसायिक गाळे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१७-०२-२०२१) :** (१) व (२)

कृषी पणन महामंडळाकडून दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. तथापि, हंगाम २०१९-२०२० मध्ये कोरोना-१९ च्या प्रादुर्भावामुळे महोत्सवाचे आयोजन करणे शक्य न झाल्याने आंबा विक्रीकरीता पुणे येथील वखार महामंडळाचे गोडाऊन तात्पुरत्या तत्वावर भाड्याने घेऊन आंब्याच्या विक्रीची व्यवस्था करण्यात आली. तसेच बाजार समित्यांचे कामकाज सुरळीत ठेऊन आंब्याचे व्यवहार सुरळीत सुरू होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(१७) १२३६२ (१७-०९-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील जवळपास तीस हजार शेतकऱ्यांना महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ दिनांक २२ जून, २०२० रोजीपर्यंत मिळाला नसल्याचे जिल्हाधिकारी यांनी कृषी मंत्री यांना पाठवण्यात आलेल्या निवेदनानुसार समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन राज्य शासनाने शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१८-०२-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

श्री मनिष (सुधीर) डांगे यांनी दिनांक १२.०६.२०२० रोजी अशा आशयाचे पत्र जिल्हाधिकारी, वाशिम यांचे मार्फत मा. मंत्री (कृषी) यांना पाठविले होते.

(२) होय.

(३) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत दिनांक १७.११.२०२० अखेर पर्यंत वाशिम जिल्ह्यातील ९३,३४० पात्र कर्जखात्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र कर्ज खातेदारांच्या यादीपैकी आधार प्रमाणीकरण झालेल्या ९०,३७७ कर्जखात्यांना रु. ५७०.१३ कोटीचा लाभ देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे यासाठी विविध माध्यमातून शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे. तसेच जिल्हाधिकारी, वाशिम यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय तक्रार निवारण समितीच्या सभा घेण्यात येतात. त्या सभांमध्ये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अनुषंगाने प्राप्त तक्रारींचा निपटारा करणेसाठी बँकांना आवश्यक त्या सुचना दिल्या जातात. या योजनेच्या अनुषंगाने प्रमाणीकरण झालेल्या कर्जखात्यांना योजनेचा लाभ देण्याची प्रक्रिया तसेच तक्रारींचे निवारण करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कामांमध्ये झालेली अनियमितता

**(१८) १२४३८ (२०-०९-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीला नवी मुंबई महानगर पालिकेने दिलेला बांधकाम परवाना व नकाशा नुसार बाजार समितीतील विकास टप्पा २ मार्केट १ मधील जी विंग व गाळ्यांची कामे दिलेल्या एफएसआय (FSI) प्रमाणे न करता गाळे धारकांशी आर्थिक हितसंबंध ठेवून जास्त प्रमाणात अनधिकृत बांधकामे केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये वेगवेगळ्या सिविल्स (Civil) कामांच्या प्रकल्पामध्ये विकास टप्पा, मार्केट, रस्ते घोटाळे व इतर कामांमध्ये गैरव्यवहार तसेच मोजमापामध्ये अनियमितता मोठ्या प्रमाणात झाली आहे, तसेच काँक्रीटची जाडी वाढवून पैसे घेणे, पणन संचालक यांच्या १२(१) च्या मंजूरी नुसार खोदकामाची शासनास रॉयल्टी भरली नसणे, FSI मधील गैरव्यवहार, ज्या गाळ्यांना FSI दिला होता त्या गाळेधारकांनी सी. सी. प्रमाणे काम न करता अतिरिक्त बांधकाम करणे, रक्कम कमी भरून अनधिकृत बांधकाम केले असून, त्यांना अभय देणाऱ्या अभियंत्यांनी व सचिवांनी शासनाच्या महसूलाचे नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, Dimensions Architects च्या अहवालानुसार ही सर्व बांधकामे तोडून नवीन बांधकाम महानगर पालिकेच्या परवानगी नुसार करावे असे सांगण्यात आले असता, काही अधिकारी यांनी या पत्राची दखल न घेता व अनधिकृत बांधकामे न तोडता त्या कामांना अभय दिले आहे, हे ही खरे आहे काय

(४) तसेच, भरती घोटाळ्या अंतर्गत श्री सतीश देशमुख यांची चुकीच्या अनुकंपा तत्वाने कनिष्ठ अभियंता म्हणून भरती करणे, श्री. ख्रिस्ते यांची कनिष्ठ अभियंता या पदावर भरती करताना त्या पदासाठी पुरेसा अनुभव नसतानासुद्धा त्यांची चुकीच्या कागदपत्रांच्या सहाय्याने भरती करणे. श्री.व्ही.बी बिरादार यांनी आवश्यक अनुभव पात्रता धारण केली नसणे, श्री.ऐस.सी.सज्जन शेट्टी व सुदर्शन भोजनकर हे दोन उप अभियंते असताना व त्यांचावर कोणत्याही कामाची जबाबदारी नसताना श्री.पिंगळे (कनिष्ठ अभियंता) यांना प्रभारी उप अभियंता म्हणून पदोन्नती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, काही प्रकल्पांची २० वर्षापासून भोगवटा प्रमाणपत्र न घेता विक्री करणे, त्याच प्रकल्पाची शासनास रॉयल्टी न भरता ठेकेदारांच्या देणे, फळ बाजार आवारातील बहूद्देशीय इमारतीच्या रक्कम २० कोटीवरुन ४८ कोटी इतकी करुन विकासकासोबत आर्थिक संगनमत करुन आर्थिक गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२२-०२-२०२१) :**(१) व (२)

विकास टप्पा २, मार्केट १ येथील गाळेधारकांना फक्त एफएसआय (FSI) चे वाटप करण्यात आले होते, परंतु, नवी मुंबई महानगरपालिकेने मंजुर केलेल्या आराखडयानुसार अद्यापपर्यंत एकाही गाळाधारकांना बाजार समितीमार्फत बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आलेली नाही. परंतु, गाळेधारकांनी अनधिकृतपणे बांधकामे केली आहेत, त्याविरूध्द महानगरपालिकेने कार्यवाही सुरू केली होती, मात्र, गाळेधारकांनी न्यायालयात दाद मागितल्यामुळे प्रकरण न्यायपविष्ठ आहे.

(३) हे खरे नाही.

विकास टप्पा-१, मार्केट-१ येथील गाळयांवर प्रथम मजल्याचे बांधकाम करण्यासाठी घ्यावयाच्या परवानगीकरीता आर्किटेक्ट मे.डायमेन्शन यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. या संस्थेनेच काही गाळाधारकांनी वाढीव बांधकाम केल्याचे दि.२८.०६.२०१२ रोजी कळविले होते. अनधिकृत बांधकामे तोडण्यासाठी महापालिकेने कार्यवाही सुरू केली होती, मात्र, गाळधारकांनी न्यायालयात दाद मागितल्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) श्री.सतीश देशमुख यांची अनुकंपा नियुक्ती बाजार समितीच्या सेवानियम क्र.२६ (क) नुसार पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेनंतर करण्यात आली आहे.

श्री.आर.आर.खिस्ते व व्ही.बी.बिरादार यांच्या कनिष्ठ अभियंता या पदावरील नेमणूक, अनुभव व शैक्षणिक पात्रता याबाबत बाजार समितीकडे प्राप्त तक्रारीची चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी नेमण्यात आला आहे. चौकशी अधिकारी यांनी दि.१५.०१.२०१९ रोजी त्यांचे म्हणणे सादर करणेची नोटीस दिली होती. मात्र, या दोघांनी या नोटीस विरूध्द दाद मागून मा.उच्च न्यायालयाकडून त्यांच्याविरोधात कोणतीही कारवाई करू नये असे अंतरिम आदेश प्राप्त करून घेतले आहे. प्रकरण न्यायपविष्ठ आहे.

श्री.एस.सी.सज्जन शेट्टी व सुदर्शन भोजनकर उप अभियंता यांचेवर बाजार समितीच्या पाचही बाजार आवाराबाबतची व मुख्यालयाची जबाबदारी होती. यापैकी श्री.एस.सी.सज्जन शेट्टी यांनी स्वेच्छानिवृत्ती योजनेचा लाभ घेतल्यामुळे, त्यांना दि.३१.०५.२०२० रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे. श्री.पिंगळे, कनिष्ठ अभियंता हे सेवाजेष्ठ असल्यामुळे त्यांच्यावर उपअभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. नंतर त्यांना उपअभियंता पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

(५) व (६)

बाजार समितीने भोगवटा प्रमाणपत्र न घेता एकूण ६१ फळे व भाजीपाला मार्केट कार्यालये व एकूण ११ कॅटिनची विक्री केली हे खरे आहे. निविदेतील अंदाजपत्रक संबंधित खोदकामाचा दर हा रॉयल्टीसह असतो, त्यामुळे चालू असलेल्या प्रकल्पाच्या खोदकाम झाल्यानंतर त्यांची विल्हेवाट लावणे व संबंधित विभागाची रॉयल्टी करणे ही संबंधित विकासकाची जबाबदारी असते.

फळ बाजार आवाराचे विकासासाठी २०११ मध्ये परवानाही देण्यात आली त्यावेळी रू.२०.८३ कोटी इतक्या रक्कमेची मंजूरी होती, त्यावेळी निविदेप्रमाणे तीन मजल्याचे बांधकाम प्रस्तावित होते. मात्र, त्यानंतर संचालक मंडळाने, सिडकोने, वाढीव FSI ला परवानगी दिल्यामुळे तीन मजल्याऐवजी सहा मजल्याचे बांधकाम करण्याचा निर्णय घेतला व त्यास पणन संचालकाची अंतिमत: दि.१६.११.२०१८ रोजी मान्यता दिली. त्यानुसार बहुउद्देशीय इमारतीच्या बांधकामासाठी रू.४६.८५ कोटी इतक्या रक्कमेचे आदेश दिले होते.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) कृषी उत्पन्न बाजार समितीचे तत्कालीन वरिष्ठ लिपिकाने केलेला गैरव्यवहार**

**(१९) १२४६८ (१७-०९-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे तत्कालीन वरिष्ठ लिपिक, श्री.प्रकाश नारायण घ्यार यांनी सन २००९-१० मध्ये सुमारे ५० ते ५५ लाख रुपयांचा गैरव्यवहार केला असून, आजपर्यंत त्याची चौकशी व कारवाई सुरु असल्याचे लेखापरीक्षणात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त चौकशी कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१७-०२-२०२१) :**(१), (२) व (३) होय, हे अशंत खरे आहे,

जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, ठाणे यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, उल्हासनगरचे सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण केले असून दि.०२.०९.२०११ रोजी लेखापरिक्षण अहवाल बाजार समितीकडे सादर केला आहे. सदरच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये बाजार फीच्या येणे वसूलीबाबत अपहार, गैरव्यवहार झाला असल्याचे नमूद केलेचे दिसून येत नाही. तथापि, लेखापरिक्षकांनी श्री.प्रकाश नारायण घ्यार, तत्कालीन वरिष्ठ लिपिक यांचे कालावधीत १४१ पाने गहाळ दिसत असून त्यानुसार त्यांचे कालावधीत रूपये २१,६३,७९१/- इतकी रक्कम व्यापाऱ्यांकडून वसूल होऊ शकते असे म्हटले आहे. सदरची रक्कम त्यांनी बाजार समितीच्या दोन कर्मचाऱ्यांच्या कागदपत्रांच्या हस्तांतरणावरून दर्शविले आहे असे स्पष्ट दिसून येते. परंतु, बाजार समितीमधील सर्व कागदपत्रे / उत्पन्न / खर्च पत्रक / तेरीज पत्रक व ताळेबंद पाहता सदरची रक्कम येणे असल्याचे दिसून येत नाही असे अहवाल सादर केला होता.

सदर गैरव्यवहाराबाबत चौकशी करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांनी दि.१३.०३.२०१२ च्या आदेशान्वये महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ५७ अन्वये श्री.आर.के.भास्कर, तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उल्हासनगर यांची नियुक्ती प्राधिकरण तथा न्यायाधिकरण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी अद्यापपर्यंत अहवाल सादर केलेला नाही. श्री.भास्कर हे दि.३०.०४.२०१९ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत.

मा.श्री.दौलत दरोडा, आमदार शहापूर, (अज) विधानसभा यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, उल्हासनगर यांच्याकडे दिलेल्या दि.०४.०१.२०१९ च्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे कार्यालयाने दि.३०.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उल्हासनगर यांचेकडून अहवाल मागविला असता त्यांनी दि.१५.०६.२०२० रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केलेला आहे. सदरचे अहवालाचे अवलोकन केले असता बाजार समितीचे व्यापाऱ्याकडून येणे असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येत नसल्याचे नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रंथालयांना अनुदानाचा दुसरा हफ्ता देण्याबाबत**

**(२०) १२४७६ (०९-०९-२०२०). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातीलअ. ब. क. आणि ड. श्रेणीनुसार ग्रंथालयांना वर्षातून २ हफ्त्यांमध्ये शासनातर्फे अनुदान दिले जात असुन त्यामध्ये ज्यात कर्मचाऱ्यांचे वेतन सुद्धा असते, परंतु वर्ष २०१९-२० चा अनुदानाचा दुसरा हफ्ता अजून पर्यंत प्राप्त झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दुसरा हफ्ता तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

३. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) गोंदिया जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना सन २०१९-२० मधील परिरक्षण अनुदानाचा दुसरा हप्ता अदा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्धवत नाही.

---

**मौजे येडेनिपानी (ता. वाळवा, जि. सांगली) येथील मल्लिकार्जुन व संतोषगिरी डोंगर परिसर पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करणेबाबत**

**(२१) १२५०९ (१६-०९-२०२०). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे येडेनिपानी (ता. वाळवा, जि. सांगली) येथील मल्लिकार्जुन व संतोषगिरी डोंगर परिसर जैवविविध संवर्धन व पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका नामांकित संस्थेने केलेल्या पाहणीनुसार या परिसरात विपुल प्रमाणात पशु-पक्षी व दुर्मिळ जैवविविधता असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देऊन हा परिसर जैवविविध संवर्धन व पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०१-०३-२०२१) :**(१), (२), (३) व (४) सदर पर्यटन स्थळ विकसित करणेबाबतचा प्रस्ताव अद्याप विचाराधीन आहे.

---

**राज्यातील माथाडी कामगारांच्या बँकांमध्ये ठेवलेल्या ठेवींचा झालेला अपहार**

**(२२) १२६५६ (०७-१०-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माथाडी कामगारांच्या ग्रॅज्युइटी/पी.एफ. ची रक्कम शासनाच्या कामगार बोर्डाकडे जमा केली जात असून राज्य शासनाच्या अस्तीत्वात असलेल्या या पाच कामगार बोर्डामार्फत ही रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत जमा ठेवली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ५० हजार माथाडी कामगारांची आयुष्यभराची पुंजी, कामगार बोर्डातील अधिकारी व राष्ट्रीयकृत बँका यांच्या संगनमताने, बनावट कागदपत्रांचा वापर करून परस्पर इतर खात्यामध्ये वळवून घेतल्याच्या आरोप माथाडी कामगार संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय वा निमशासकीय संस्थाच्या कोटयवधी रुपयांच्या ठेवी अनेक राष्ट्रीयकृत बँकेत ठेवल्या जात असून, या ठेवीबाबत संबंधीत संस्थाशी पत्रव्यवहार करून संमती घेतल्याशिवाय त्या इतरत्र वापरण्याचे अधिकार बँकांना नसतात, हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास, उक्त प्रकरणी माथाडी कामगार संघटनानी याप्रकरणी सी.बी.आय. चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) मुंबई मधील माथाडी मंडळानी विविध बँकामध्ये गुंतविलेल्या रकमेच्या अपहारची वसुली करणेबाबत व दोषीवर कारवाई करणेबाबतची तक्रार प्राप्त झालेली आहे.
(५) माथाडी मंडळातील गुंतविलेल्या रकमेच्या अपहारसंबधी कोपर खैरणे, पनवेल शहर, भायखळा पोलिस ठाणे, मुंबई व साकीनाका पोलिस ठाणे येथे गुन्हे दाखल केले आहेत. या व्यतिरिक्त कापड बाजार व दुकाने मंडळातील रुपये ५.०० कोटी रकमेच्या अपहाराबाबत मंडळाच्या संबंधित तत्कालीन अधिकाऱ्यांनी रकमेची गुंतवणूक करताना निष्काळजीपणा व प्रशासकीय अनियमितता केल्याचे प्राथमिक चौकशी अहवालामध्ये दिसून आल्याने संबधितांविरूध्द प्रशासकीय कारवाई सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**माथाडी कामगारांच्या कामाच्या दरातील तफावत दुर करण्याबाबत**

**(२३) १२६९४ (२०-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माथाडी कामगारांचे संरक्षण करण्याकरीता महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण अधिनियम, १९६९) कायदा करण्यात आला असुन तदनुषंगाने मंडळ स्थापन करण्यात येवुन मंडळामार्फत माथाडी कामगाराचे कार्य पाहिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कायद्याअंतर्गत महाराष्ट्रात ३६ मंडळे स्थापन करण्यात आली असुन या मंडळामार्फत माथाडी कामगार काम करीत असुन त्यांचे कामाचे दर निश्चित केले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माथाडी कामगार हे हमाल असल्याने सर्वच ठिकाणी एक समान काम म्हणजेच ओझे उचलणे, चढवणे, उतरविणे, रचुन ठेवणे, अशासारखी कामे करत असूनही मुंबई व नागपूर येथील माथाडी कामगारांच्या कामाच्या दरात तफावत असल्यामुळे कामाच्या दराच्या तफावती व माथाडी कामगारांच्या चुकीच्या धोरणामुळे राज्यातील व्यापार इतर राज्यात स्थलांतरीत झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कामाच्या दरात असलेली तफावत दुर करुन माथाडी कामगारांच्या चुकीच्या धोरणात सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-०२-२०२१) :** (१) व २) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ मधील व सदर अधिनियमाच्या कलम ४ अन्वये लागू केलेल्या मंडळाच्या योजनांमधील तरतूदींनुसार सर्व संबंधिताचे म्हणणे विचारात घेऊन माथाडी कामगाराची मजुरी, भत्ते व सेवेच्या अन्य शर्ती ठरविण्याबाबत मंडळास अधिकार प्राप्त आहेत. त्यानुसार माथाडी मंडळामार्फत कार्यवाही करण्यात येते.

(४) माथाडी मंडळाने निश्चित केलेले कामाचे दर मान्य नसल्यास त्यावर मा. उच्च न्यायालयात संबंधिताकडून दाद मागितली जाते. त्यानुसार नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाविरुध्द १ जनहित याचिका व विविध आस्थापनेने दाखल केलेल्या ११ याचिका मा मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचेसमोर न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**पांढरकवडा (जि. यवतमाळ) येथील प्रकल्प कार्यालयाच्या खेळाच्या निधीत झालेला गैरव्यवहार**

**(२४) १२८३५ (१८-०८-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि. यवतमाळ) येथील प्रकल्प कार्यालयामार्फत सन २०१७-२०१८ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या खेळासाठी ११ लक्ष रुपये एवढा निधी खर्च झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९-२०२० मध्ये आयोजित करण्यात आलेल्या त्याच खेळाकरिता ३५ लक्ष रुपये निधी खर्च झाला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीमधुन कबड्डी, खो.खो, व्होलीबॉल, उंच उडी इत्यादी विविध प्रकारच्या खेळाकरिता निधी देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१९-२०१८ व सन २०१९-२०२० मध्ये सारखेच खेळ घेण्यात आले असतांनाही खर्च केलेल्या निधीमध्ये तफावत असल्याचे आढळुन आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१०-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

सन २०१७-१८ या शैक्षणिक सत्रामध्ये जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना सन २०१७-१८ अंतर्गत अर्थसंकल्पित निधी दि.१६.०१.२०१८ च्या आदेशानुसार रु. ७.०० लक्ष इतका वितरीत करण्यात आला होता.

सन २०१९-२० या शैक्षणिक सत्रामध्ये प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धेकरीता सर्व खर्च हा आश्रमशाळा समूह राज्यस्तर यामधून करण्यात आलेला आहे.
(४) हे खरे आहे.

शैक्षणिक सत्र २०१७-१८ मध्ये एकूण ८६०व शैक्षणिक सत्र २०१९-२० मध्ये ११३८ विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक सत्राच्या तुलनेत सन २०१९-२० या शैक्षणिक सत्रामध्ये विद्यार्थ्यांकरीता अधिकच्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या होत्या.
(५) सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्याबाबत आयुक्त, आदिवास विकास, नाशिक यांनी दि.२१.०७.२०२० च्या पत्रान्वये अपर आयुक्त, अमरावती यांना निदेश दिले आहेत.

---

**महाविद्यालयातील राखीव कोट्यातील प्रवेश फेरीमधून प्रवेश घेतलेल्या प्रवेशार्थीना शिष्यवृत्ती मिळणेबाबत.**

**(२५) १३२७७ (१७-०९-२०२०). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विनानुदानित महाविद्यालयातील प्रवेश फेरीमधून रिक्त असलेल्या जागा महाविद्यालयाना भरणेस परवानगी दिली जाते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे प्रवेश हे शासनाच्या कोट्यावरील रिक्त जागी दिले जात असून या प्रवेशार्थीना शिष्यवृत्ती दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, व्यवस्थापन कोट्याव्यतिरिक्त इतर प्रवेशांना शिष्यवृत्ती मिळणे अपेक्षित असता शासनाच्या कोट्यावरील रिक्त जागेवर प्रवेश दिलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी महाविद्यालयातील शासनाच्या राखीव कोट्यातील प्रवेश फेरीमधून रिक्त राहिलेल्या जागांवर दिलेल्या प्रवेशार्थीना शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१७-०२-२०२१) :** (१) होय.
(२) हे खरे आहे.
(३) नाही,

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील

विद्यार्थ्यांकरीता राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना दि.१३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निणर्यान्वये सुधारित स्वरुपात लागू करण्यात आली आहे. मात्र ही शिष्यवृत्ती योजना व्यवस्थापन कोटयातून अथवा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील फुल उत्पादकांना लॉकडाऊनमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत**

**(२६) १३४२२ (१७-०९-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यासह राज्यातील फुल बाजार समित्या दिनांक २२ मार्च, २०२० रोजी लॉकडाऊन झाल्यामुळे बंद केल्याने फुल उत्पादकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्यासाठी पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक ३ मे २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन फुल उत्पादकांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१७-०२-२०२१) : (**१) व (२) अंशत खरे आहे.

राज्यातील सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडून माहिती घेतली असता, राज्यातील काही निवडक कृषी उत्पन्न बाजार समित्यामध्येच फुलांची विक्री केली जाते. ज्या कृषी उत्पन्न बाजार समितीत फुलांची विक्री केली जाते, त्या बाजार समित्यांकडे नुकसान भरपाई देणेबाबत बाबत अर्ज / तक्रार प्राप्त झालेले नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औंढा नागनाथ (जि. हिंगोली) तालुक्यातील अनेक गावांच्या दत्तक बँका अचानक बदलल्याबाबत**

**(२७) १३५८४ (१७-०९-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीककर्ज काढण्यासाठी विविध बँकांना गावे दत्तक देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी औंढा नागनाथ तालुक्यातील अनेक गावाच्या दत्तक बँका अचानक बदलण्यात आल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणीचा सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गावाच्या दत्तक बँका अचानक बदलण्याची कारणे काय आहेत व शेतकऱ्यांना पिककर्ज काढण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१८-०२-२०२१) :** (१) होय.

(२) नाही.

(३) औंढा नागनाथ तालुक्यातील पेरजाबाद व गोजेगाव या २ गावांतील शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागला होता. या दोन गावांच्या ग्रामपंचायतींनी दिनांक २०.०५.२०२० (पेरजाबाद ग्रामसभा) व दिनांक ०४.०६.२०२० (गोजेगांव ग्रामसभा) रोजी ग्रामसभा ठराव घेऊन बँका बदलण्याची मागणी केली.

या दोन गावांच्या ग्रामसभांच्या मागणीनुसार दिनांक ३०.०६.२०२० रोजी झालेल्या जिल्हास्तरीय समन्वय समिती (DLCC) सभेतील निर्णयानुसार दत्तक बँकांमध्ये ग्रामसभांच्या मागणीनुसार बदल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील जैन इरीगेशन कंपनीतील सुरक्षा रक्षकाचा झालेला मृत्यु**

**(२८) १३६६१ (२०-०९-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील लोअर वर्धा प्रकल्पावर आर्वी सुक्ष्म सिंचन योजनेतंर्गत जैन इरीगेशन, जळगांव या कंपनीला सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याचे काम CISS या कंपनीला देण्यात आले असून या कंपनीमार्फत स्व.श्री. देविदास रामदासजी ढोक, रा. निजामपुर (टा.), ता.आर्वी, जि.वर्धा हे धनोडी येथे पंप हाऊस चे कामावर सुरक्षा रक्षक म्हणुन कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्व.श्री. देविदास रामदासजी ढोक हे CISS कंपनी मार्फत जैन इरीगेशन कंपनी जळगांव द्वारे धनोडी येथे पंप हाऊसवर सुरक्षा रक्षक म्हणुन कार्यरत असतांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मृत्यु झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुरक्षा रक्षक श्री.देविदास ढोक यांचा कार्यरत असतांना मृत्यु झाला असतांनाही कंपनीमार्फत कंपनी ॲक्टनुसार कोणतीही आर्थिक मदत करण्यात आली नसून त्यांच्या वारसदारांना नोकरी देखील देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

मयत श्री. ढोक यांच्या वारसास भविष्य निर्वाह निधी व कामगार विमा योजनेचे लाभ मिळण्याबाबतची प्रक्रिया मंडळ स्तरावर सुरु आहे. तसेच कंपनीने तातडीने रुपये १५०००/ वारसास दिले आहेत. तसेच मयत श्री.ढोक यांच्या मुलास वाहनचालक म्हणून नोकरी दिलेली आहे. ESIC नाशिक यांचेकडून मयत श्री. ढोक यांच्या वारसास खालीलप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येत आहे.

| अ.क्र. | वारसाचे नाव | मासिक | रुपये |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती देवकी देविदास ढोक | आजन्म/पुर्नविविवाह करेपर्यंत | ४३२०/- |
| २. | श्रीमती नुतन देविदास ढोक (मुलगी) | लग्न होईपर्यंत | २८८०/- |
| ३. | सुमित देविदास ढोक (मुलगा) | ०६.११.२०२२ पर्यंत | २८८०/- |

तसेच नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने केलेल्या तपासणीमध्ये कंपनीच्या निरीक्षणामध्ये आढळून आलेल्या त्रुटीबाबत प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी आर्वी जि वर्धा न्यायालयात (९७५/२०२०) दावा दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**भांडूप (मुंबई) येथे मॅजेस्टिक टॉवर प्रकल्पात ग्राहकांची केलेली फसवणूक केल्याबाबत**

**(२९) १३६६७ (२०-०९-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भांडूप (मुंबई) येथे मॅजेस्टिक टॉवर प्रकल्पात ४०० ग्राहकांची जवळपास २०० कोटी रुपयांची फसवणूक केली असून या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेच्या गृहनिर्माण कक्षामार्फत सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मॅजेस्टिक टॉवर मधील सदनिका मालक संघटनेच्यावतीने पोलीसात व महारेराकडे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील काय आहे,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी ज्या ग्राहकांची फसवणूक झाली आहे त्यांना भरपाई देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, तसेच संबंधितांना भरपाई केव्हापर्यंत देण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०२-०३-२०२१) :** (१) होय.
(२) होय

सदनिका मालकांनी महारेराकडे रेरा कलम ७ अन्वये तक्रार दाखल केली होती. परंतू

एनसीएलटी (NCLT) कडे सुनावणी सुरु असल्याने अर्ज निकाली काढण्यात आला.
(३) या प्रकरणी प्रा.चौ.क्र.९२/१९ मध्ये केलेल्या चौकशीत (१) एच.डी.आय.एल. कंपनी व कंपनीचे संचालक (२) राकेशकुमार कुलदीपसिंग वाधवान (३) सारंग राकेश वाधवान (४) ललित मोहन मेहता (५) संध्या बालिगा (६) राजकुमार अगरवाल (७) हजारी लाल (८) कंपनी सेक्रेटरी दर्शन धृपद मुजुमदार यांच्याविरुध्द दिनांक १८.०१.२०२० रोजी आ.गु.वि.गु,र.क्र.०३/२०,कलम ४०९, ४२०, ३४ भादंवि सह ३,४,१३, १४ मोफा कायदा अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून त्याचा तपास सुरु आहे.
(४) सदर मॅजेस्टिक टॉवर प्रकल्पातील बळीत गुंतवणूकदारांनी मॅजेस्टिक टॉवर फ्लॅट ओनर असोसिएशन या नावाने संघटना स्थापन केली आहे. सदर संघटनेचे विधी सल्लागार सॉलीसिक्स यांनी मा.राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांच्याकडे संकीर्ण अर्ज क्र.३४७३/२०१९ नुसार केलेल्या दाव्याप्रमाणे मा.न्यायाधिकरणाने मॅजेस्टिक टॉवर प्रकल्पातील सदनिका खरेदीधारकांचा दावा मान्य केला असून सदर दावा प्रलंबित आहे. मा.न्यायाधिकरणाच्या आदेशाने कंपनीचा ताबा त्यांनी नेमलेल्या Resolution professional यांच्याकडे आहे.
(५) प्रश्न उद्‌भभवत नाही.

---

**नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील ठेवी नागरिकांना परत देण्याबाबत**

**(३०) १३७८७ (२०-०९-२०२०). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नोटा बंदीच्या निर्णयानंतर नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने फिक्स डिपॉझीट म्हणून ठेवलेल्या सर्वसामान्य नागरिकांच्या ठेवी मोडण्यास बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे पगारदार, सेवानिवृत्त तसेच जिल्हा बँकांवर विश्वास ठेवलेल्या हजारो खातेदारांच्या करोडो रुपयांच्या रक्कमा अडकल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नाशिक जिल्हा बँकेला आदेशित करून नागरिकांच्या ठेवी परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१६-०२-२०२१) :** (१) नाही.
(२) अंशतः खरे आहे.
नोटाबंदीनंतर माहे मे, २०२० अखेर पर्यंत नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रु. १११५.९४ कोटीच्या ठेवी परत केलेल्या आहे. यामध्ये रु. ३८०.८६ कोटीच्या मुदत ठेवींचा समावेश असून एकूण ३८,०४४ खातेदारांना रु. ३५६.८४ कोटीच्या वैयक्तिक स्वरुपाच्या मुदतठेवी परत करण्यात आलेल्या आहेत. यांत प्रामुख्याने पगारदार, सेवानिवृत्त व सर्व सामान्य नागरिकांच्या ठेवींचा समावेश आहे. सद्‌यस्थितीत बँकेकडे निधी उपलब्ध नसल्याने

बँक ठेवीदारांनी ठेवीची मागणी करताच ठेवीची रक्कम परत करु शकत नाही, तथापी उपलब्ध निधीमधून बँक प्राधान्याने आरोग्य, शिक्षण, विवाह इत्यादी कारणांसाठी ठेव परत करण्याचा प्रयत्न बँक करीत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेलू (जि.परभणी) तालुक्यातील महावितरण कार्यालयामार्फत केलेल्या दुरूस्ती कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३१) १४०८६ (१९-०७-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) तालुक्यातील महावितरण कार्यालयामार्फत करावयाच्या दुरूस्ती कामांमध्ये कार्यालयीन अधिकारी कर्मचारी व संबंधित ठेकेदार यांनी कामे न करता आपसात संगनमताने न केलेल्या कामांची देयके समंत करुन गैरव्यवहार केल्याचे दिनांक १३ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व संबंधित ठेकेदार मागील दोन वर्षापासून अशाच प्रकारे दुरुस्तीची काम न करता देयके समंत करुन गैरव्यवहार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२९-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही. महावितरणच्या नांदेड परिमंडळाअंतर्गत परभणी मंडळ कार्यालय येते. परभणी मंडळाअंतर्गत एकूण दोन विभागीय कार्यालय कार्यरत असून सेलू उपविभाग हा परभणी विभाग क्र.२ अंतर्गत येत आहे. माहे सप्टेंबर, २०१९ पासून पीएम/बीएम अंतर्गत ई-निविदाद्वारे मंडळ व विभागीय स्तरावर तीन वर्षासाठी प्लान्ट मेंटेनन्समध्ये तीन व ब्रेकडाऊन मेंटेनन्समध्ये तीन अशा विद्युत ठेकेदारांची नेमणूक करण्यात आलेली आहे. विद्युत देखभाल व दुरुस्तीची कामे या नियुक्त केलेल्या ठेकेदारांमार्फत करण्यात येत आहेत. सदरची कामे सुरळीत चालू असून या कामाबाबत गैरव्यवहार केल्याबाबतची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) माहे सप्टेंबर, २०१९ पूर्वी विद्युत देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी मंडळ स्तरावर आदेशित केलेल्या एकूण नऊ विद्युत ठेकेदारांना कामे देण्यात आलेली होती. ती कामे सुरळीतपणे करण्यात आलेली असून तयांनी केलल्या कामाची रु.५५,५९,७९०/- एवढी देयके विद्युत ठेकेदारांना अदा करण्यात आलेली आहेत. सदर कामात कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार केल्याबाबतची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगर, ठाणे आणि नवी मुंबई या शहराच्या हद्दीत सुमारे १७ किमी लांबीच्या खाडी फ्लेमिंगो अभयारण्य म्हणून केल्याबाबत**

**(३२) १४३७३ (१५-०९-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर, ठाणे आणि नवी मुंबई या शहराच्या हद्दीतील सुमारे १७ किमी लांबीच्या खाडी किनाऱ्यावर फ्लेमिंगो अभयारण्य जाहीर झाल्यामुळे १० किमी परिघातील बांधकामांवर निर्बंध आल्याने सुमारे पाच हजार बांधकाम प्रकल्प अडचणीत आल्याचे माहे जुलै २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून अभयारण्याच्या अंतिम अधिसूचनेसाठी पाठपुरावाच होत नसल्याने बांधकामांच्या मंजुरीवर निर्बंध कायम आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित असण्याची नेमकी काय कारणे आहेत व उक्त प्रस्तावास मान्यता देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (२८-०१-२०२१) :** (१) दिनांक १०.०५.२०१८ रोजी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ४६०/२००४ मध्ये दिनांक ०४.१२.२००६ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये अभयारण्यभोवती चे पर्यावरण संवदेनशील क्षेत्राची अंतिम अधिसूचना जारी होईपर्यंत अभयारण्य भोवतीचे १० कि.मी. अंतरामध्ये येणाऱ्या क्षेत्रास मानीव पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून गृहीत धरण्यात येईल असे नमूद आहे.

ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य पर्यावरण संवेदनशिल क्षेत्रामध्ये बांमकामे प्रतिबंधीत करण्यात येत नसुन बांधकामाचा समावेश नियमीत करण्या योग्य उपक्रमात होतो. त्यामुळे बांधकामावर निर्बंध आले हे खरे नाही.

(२) व (३) केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालयामार्फत दिनांक ०६.११.२०१९ रोजी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्या सभोवताली ० ते ३.५ किलो मिटरपर्यंतचे क्षेत्र संवेदनशील म्हणून जाहीर करण्याबाबत प्रारुप अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

दिनांक ०४.०२.२०२० रोजी केंद्र शासन स्तरावर तज्ञ समितीची बैठक संपन्न झाली आहे. सदर समितीने सुचविलेल्या सुधारणानुसार सुधारीत प्रस्ताव तयार करुन केंद्र शासनास पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मंजूरी मिळेपर्यंत पर्यावरण संवेदनशील क्षेत्र १० कि.मी. पर्यंतच मान्यण्यात येते.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**मुबईमध्ये ताडी बनविण्यासाठी क्लोरल हायड्रेट रसायनाचा वापर होत असल्याबाबत**

**(३३) १४५४८ (०२-१२-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत ताडी बनविण्यास क्लोरल हायड्रेट या विषारी रसायनाचा वापर केला जात असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या क्लोरल हायड्रेटमुळे मळमळणे, चक्कर येऊन तोल जाणे, उलटी होणे तसेच अनेकदा बेशुद्ध होणे असे प्रकार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरात असलेल्या २५० दुकानांत याचा पुरवठा केला जात असल्याचे आढळून आले असून येऊन हा पुरवठा करणाऱ्या दोषींना पोलिसांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२८-०१-२०२१) :**(१) सन २०१९-२० या वर्षात मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन्ही जिल्हयात मिळून १६० ताडी अनुज्ञप्ती कार्यरत असून, त्यापैकी १७ ताडी अनुज्ञप्तींमध्ये क्लोरल हायड्रेट मिश्रीत ताडी विक्री होत असल्याचे तपासणी अहवालाअंती निदर्शनास आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. क्लोरल हायड्रेट हा एक शामक औषधी प्रकार असून, त्यामुळे निद्रेस उत्तेजन मिळते असे शास्त्रीयदृष्टया दिसून येते.

(३) व (४) राज्य उत्पादन शुल्क विभागाने दोषी आढळलेल्या १७ ताडी दुकानांची अनुज्ञप्ती त्वरीत रद्द करुन संबंधित अनुज्ञप्तीधारकांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ च्या कलम ६५ (इ), ७८ (अ), ८२, ८३ (अ) (ब) व भारतीय दंड संहिता कलम २७२ व ३२८ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल केला असून, प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय-निमशासकीय कार्यालयामध्ये मराठी भाषेची सक्ती करण्याबाबत**

**(३४) १४८५४ (०२-१२-२०२०). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक शासकीय-निमशासकीय कार्यालयामध्ये शासनाने मराठी भाषेची सक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रालय ते जिल्हा स्तरापर्यंत होणारा पत्रव्यवहार, माहिती, निविदा प्रक्रिया, अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तिका ह्या आजही इंग्रजी मध्ये लिहिल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने मराठी भाषेचा वापर करण्याबाबत घेतलेल्या निर्णयापासून आजपर्यंत मराठीचा वापर न करणाऱ्या विरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (११-०१-२०२१) :**१) होय, " अंशत: " खरे आहे.

(२) " अंशत: " खरे आहे.

(३) व (४) शासन व्यवहारात संयुक्तीक कारण नसताना मराठी भाषेचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत दि.१८ जुलै,१९८६ च्या शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा सक्षमपणे वापर करण्याबाबत दि.०७.०५.२०१८ च्या व दि. २९ जून २०२० च्या परिपत्रकान्वये पुन्हा सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**मंगरुळपीर (जि. वाशिम) तालुक्यातील कृषि सहाय्यकावर कारवाई करण्याबाबत**

**(३५) १४८६३ (१०-१२-२०२०). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळपीर (जि. वाशिम) तालुक्यातील कृषि सहाय्यक मुख्यालयात न राहता शहराच्या ठिकाणी राहून शासनाकडून घरभाडे भत्ता घेऊन शासनाची दिशाभूल करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शासनाची आर्थिक फसवणूक करणाऱ्या कृषि सहाय्यकावर फौजदारी व शिस्तभंगची कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-०१-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तालुका कृषि अधिकारी, मंगरुळपीर जि.वाशिम कार्यालयाच्या अधिनस्त एकूण ३३ कृषि सहाय्यक कार्यरत असून सर्व कृषि सहाय्यक शासनाने नेमून दिलेल्या मुख्यालयी राहतात.

वरिष्ठ अधिकारी जसे कृषि पर्यवेक्षक, मंडल कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांनी दिलेल्या आकस्मिक व नियमित भेटीदरम्यान सर्व कृषि सहाय्यक नेमून दिलेल्या मुख्यालयी राहत असल्याचे दिसून आले आहे. तसेच सर्व कृषि सहाय्यकांनी मुख्यालयी राहत असल्याबाबत घरमालकाची भाडेपावती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, वाशिम कार्यालयात सादर केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील घरकूल योजनेंतर्गत निधी वितरित करणे थांबविल्याबाबत**

**(३६) १५६३४ (२६-११-२०२०). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बेघर गरीब कुटुंबांचे सर्वेक्षण करुन त्यांना घरकूल बांधुन देण्यासाठी सन २०१६-१७ पासून केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना व राज्य शासन पुरस्कृत रमाई, शबरी व पारधी आवास योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना महामारीच्या साथीमुळे उक्त योजनेचा निधी वितरीत करण्याचे थांबविल्याने सोलापूर जिल्ह्यात एकूण ७९२७ लाभार्थ्यांची घरकुलांची कामे थांबविण्यात आली असून सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रमाई आवास योजनेतून मंजूर केलेल्या २२४५ घरकुलांची कामे प्रलंबित असल्याचे दिनांक ८ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चालू आर्थिक वर्षात शासनाने गरिबांना घरांसाठी जागा खरेदीच्या पंडित दिनदयाळ उपाध्याय योजना वगळता सर्व योजनांची कामे प्रलंबित ठेवली असून फक्त आरोग्याच्या कामाला प्राधान्य दिल्यामुळे घरकूल योजनांना निधी मिळालेला नाही, शासनाचे पुढील आदेश आल्यावर कामे सुरु करण्यात येतील असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडून लाभार्थ्यांना सांगण्यात आल्याचे दिनांक ८ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर जिल्ह्यातील गरीब बेघर कुटुंबांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी त्वरीत अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०३-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये रू.३००.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून सन २०२०-२१ मध्ये अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या रू.५००.०० कोटी इतक्या निधीपैकी रू.३००.०० कोटी निधी आतापर्यंत वितरीत करण्यात आला आहे. सदरील निधी संचालक, राज्य व्यवस्थापनक कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कक्षाकडे वितरीत करण्यात आला असून सोलापूर जिल्ह्यातील एकूण ३३३९० टप्पानिहाय निधी व यातील सन २०१९-२० मध्ये मंजूर २२४५ घरकुलांना पहिल्या टप्याचे अनुदान वितरीत करण्याबाबत प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर यांना अवगत करण्यात आले आहे.

(३) व (४) रमाई आवास योजना (ग्रामीण) या अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये अर्थसंकल्पीत करण्यात आलेला रू.५००.०० कोटी इतक्या निधीपैकी रू.४००.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून पुरक मागणीव्दारेहिवाळी अधिवेशन, २०२० मध्ये रू.५००.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असून उपरोक्त निधी वित्त विभागाकडून उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी पाड्यांतील आदिवासींना वन हक्क कायद्यानुसार पात्र ठरवून संरक्षण देण्याबाबत**

**(३७) १५९७७ (२५-११-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगांव (पूर्व) आरे दुग्ध वसाहतीतील दोन वर्षात आदिवासींनी २५० वन हक्क दावे, केंद्रीय वन हक्क कायदा २००६ अन्वये, शासनाकडे दाखल केल्याचे दि. १४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यानुसार निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आरे दुग्ध वसाहतीसाठी १९४९ मध्ये ३१६२ एकर संपादीत केलेल्या जमीनीमध्ये २७ आदिवासी पाड्यांचा समावेश असून पिढ्यांनपिढ्या सदरहू पाड्यात राहणाऱ्या आदिवासींनी शेतजमीनीसाठी वर्षाला प्रतिगुंठा एक रुपयाप्रमाणे शेतसारा भरुन जमिनीची वहिवाट केली असतानाही उक्त पाड्यांतील आदिवासींना सन २००६ च्या वन हक्क कायद्यानुसार अपात्र ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त आदिवासी पाडयाना आदिवासी वन हक्क कायदा २००६ अन्वये पात्र ठरवून संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१०-०२-२०२१) :** (१) होय , हे खरे आहे.

जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर कार्यालयामध्ये मुंबईतील गोरेगांव (पूर्व) येथील वेगवेगळया आदिवासी पाडयाकडून ९७ वैयक्तिक व २ सामुहिक वनहक्क दावे जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर कार्यालय यांच्याकडे प्राप्त झालेले आहेत.सदर दाव्यांवर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

तहसीलदार बोरीवली यांनी सादर केलेल्या माहितीनुसार शासनामार्फत आरे दुग्ध वसाहतीसाठी सन १९४९ मध्ये ३१६२ एकर जमीन संपादीत करण्यात आली आहे. सदर जमिनीचे शासनाकडे संपादन झाले असल्याने आरे दुग्ध वसाहत यांचेकडून कोणताही शेतसारा वसूल केला जात नाही. तसेच उपरोक्त क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी व्यक्तींकडून प्रतिवर्ष प्रतिगुंठा रुपया १/- प्रमाणे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे शेतसारा वसूल केला जात नाही. जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर यांच्याकडे दावेदारांकडून वनहक्क कायद्यानुसार ९७ वैयक्तिक व २ सामूहिक वन हक्क दावे प्राप्त झाले आहेत. सदर प्राप्त दाव्यांबाबत पात्र / अपात्रतेबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(३) राज्य स्तरीय संनियंत्रण समितीच्या २१ व्या बैठकीच्या अनुषंगाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी दि.१७/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी, मुंबई शहर व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना शासन निर्णय क्र. वहका-२०१५/प्र.क्र.६१/का-१४, दिनांक ८/०९/२०१५ अन्वये उपविभागीय स्तरीय समिती व जिल्हा स्तरीय समितीमध्ये त्या जिल्ह्यातील नगरपरिषदा/ नगरपालिका/ महानगरपालिका यांनी नामनिर्देशित करावयाच्या तीन सदस्यांची नियुक्ती प्राधान्याने करणेबाबत तसेच सदरची कार्यवाही होईपर्यंतच्या कालावधीत अंमलबजावणी यंत्रणांकडून उक्त आदिवासी पाडयांना आदिवासी वन हक्क कायदा, २००६ अन्वये दावेदारांचे दावे स्विकारण्याकरिता सुचित केले आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांनी दि.२२.०४.२०१६ अन्वये प्रस्तावित केल्यानुसार दि.०३.०५.२०१६ च्या शासन पत्रान्वये वन हक्क कायद्यातील कलम ६ (३) अन्वये उपविभागीय स्तरीय समिती व कलम ६ (५) अन्वये जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यातील उद्योगांना सवलती प्राप्त करुन देऊन रोजगार निर्मिती करण्याबाबत**

**(३८) १५९९२ (२१-११-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राचे नविन औद्योगिक धोरण दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास जाहिर करण्यात आले असून राज्याला जागतिक स्तरामध्ये गुंतवणुकीचे उत्पादनाचे केंद्र बनवून १० लाख कोटी रुपये गुंतवणूक करून त्यातुन ६० लाख नविन रोजगार निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून तद्नुषंगाने राज्यातील होतकरू युवक, युवतींसाठी राज्याची सर्वसमावेशक स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणारा मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यक्रमांतर्गत राज्यात सुमारे १० हजार लघु उद्योग सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले असून उक्त कार्यक्रमाची सद्यःस्थिती काय आहे,

(३) तसेच, नविन औद्योगिक धोरणात लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांना दिलासा देण्यासाठी राज्यात १० कोटी खर्चापर्यंत लघु व मध्यम उद्योगांना शासकीय सवलतीचा लाभ मिळत होता परंतू सदरहू मर्यादा आता वाढवून ५० कोटी रुपयापर्यंत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या नव्या धोरणानुसार उभारण्यात येणाऱ्या लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांना राज्य वस्तू सेवा कराचा १० टक्के परतावा पुढील पाच वर्षासाठी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने राज्यात उद्योगांना विविध सवलती प्राप्त करुन देऊन रोजगार निर्मिती करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२५-०१-२०२१) :**(१) होय. राज्यातील होतकरु युवक युवतींसाठी राज्याची सर्वसमावेशक स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणारी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना उदयोग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र योजना २०१९/ प्र.क्र. १२१/उदयोग-७, दिनांक ०१ ऑगस्ट २०१९ अन्वये जाहिर करण्यात आली असून योजनेचे कामकाज सन २०१९-२० पासून सुरु झाले आहे. योजनेची अंमलबजावणी पूर्णत: www.maha-cmegp.gov.in या पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने उदयोगसंचालनालयाच्या संनियंत्रणाखाली जिल्हा उदयोग केंद्रे व खादी व ग्रामोदयोगमंडळ यांच्यामार्फत जिल्हास्तरावर करण्यात येत आहे.

(२) सन २०१९-२० अंतर्गत एकूण १०००० प्रकल्पांचे (लाभार्थी) भौतिक उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. सन २०१९-२० मध्ये ३७७८३ इतके प्रस्ताव प्राप्त होऊन छाननी अंती पात्र एकूण २८६०२ प्रस्ताव बँकांना शिफारस करण्यात आले.

सादर २८६०२ प्रस्तावांपैकी ३१०२ प्रस्ताव बँकेमार्फत मंजूर करण्यात आले असून उर्वरित प्रस्तावांबाबत बँकांमार्फत मंजूरीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

सन २०१९-२० अंतर्गत मार्च २०१९ कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व लॉकडाऊन जाहिर झाल्याने बँकांमार्फत प्रस्तावांना मंजूरी मिळणेची प्रक्रियेची गती कमी होती. तथापि सदयस्थितीत सदर मंजूरीबाबत प्रक्रिया सुलभतेने सुरु असून याबाबत बँकांशी आवश्यक समन्वय करण्यात येत आहे.

(३) नवीन औदयोगिक धोरण -२०१९ परिच्छेद क्र ९.७.१ नुसार लघु मघ्यम उपक्रम अधिनियम २००६ व्याख्येनुसार तसेच ज्या लहान उदयोग घटकांची स्थिर भांडवली गुंतवणूक रु ५०.०० कोटीपर्यंत आहे, अशा घटकांना सामूहिक प्रोत्साहन योजनेचे लाभ सुक्ष्म, लघु मध्यम प्रकल्प देय केले आहेत.

(४) सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ नुसार सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना १०० टक्के ढोबळ राज्य वस्तू व सेवा करावर आधारित प्रोत्साहने अनुदान उपभोगण्याच्या कालावधीसाठी देय केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्हयातील दादासाहेब पाटील शेळके कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संचालक मंडळाने केलेला गैरव्यवहार

**(३९) १६५७० (१९-११-२०२०). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील दादासाहेब पाटील शेळके कृषी उत्पन्न बाजार समितीने विद्यमान संचालक मंडळाने मागील सात-आठ वर्षात सुमारे ८० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तत्कालीन सहाय्यक उपनिबंधक श्री.सूर्यवंशी यांच्या समितीने सन २०१८ मध्ये सादर केलेल्या अहवालात बाजार समितीमध्ये कर्मचारी भविष्य निर्वाह निधी तसेच अनेक ठिकाणी अनधिकृत गाळ्यांचे बांधकाम करुन उक्त गैरव्यवहार केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता संबंधित बांधलेले गाळे तातडीने पाडण्याचे आदेश असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगानं संबंधित दोषी संचालकांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१७-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
कृषी उत्पन्न बाजार समितीच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये ही बाब नमुद नाही.
(२), (३) व (४)
माजी खासदार मा.दादापाटील शेळके व इतर यांनी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तत्कालीन सहाय्यक उपनिबंधक श्री.सूर्यवंशी यांच्या समितीने सन २०१८ मध्ये सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन), अधिनियम, १९६३ चे कलम ४० (ई) नुसार बाजार समितीस दि.०१.१०.२०१८ च्या आदेशान्वये कपात केलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम समान हप्त्यात संबंधित भविष्य निर्वाह निधी जमा करण्याचे तसेच अनधिकृत गाळयाचे बांधकाम तात्काळ हटविणेबाबत तातडीने कार्यवाही व उपाययोजना करावी निर्देश दिलेले होते. सदर आदेशाने व्यथित होवून कृषी उत्पन्न बाजार समिती, अहमदनगर ने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे अपिल दाखल केले होते. सदर अपिलावर पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.२९.१०.२०२० रोजीच्या आदेशान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांचे आदेश रद्द केले असून जी बांधकामे अनाधिकृत / अतिक्रमीत ठरतील त्या बांधकामाबाबत बाजार समितीने त्यानंतर तीन महिन्याचे आत आवश्यक ती उपाययोजना कराव्यात, असे आदेश दिले आहेत.

अहमदनगर कृषी उत्पन्न बाजार समितीने कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात केलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम तसेच बाजार समितीच्या हिश्याची रक्कम भरणा बाकी आहे. बाजार समितीने तिची आर्थिक अडचणीमुळे रक्कम थकीत असल्याचे मान्य केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिका यांनी अनाधिकृत असलेली बांधकामे पाडण्याचे आदेश कृषी उत्पन्न बाजार समितीस दिले होते. सदर आदेशाविरूध्द कृषी उत्पन्न बाजार समिती व गाळेधारकांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केली आहे त्यामुळे सदर प्रकरण न्यायपविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अडगाव (ता.तेल्हारा, जि.अकोला) येथे पोलिसांनी छापा टाकून गांजा जप्त केल्याबाबत.**

**(४०) १७७६१ (१३-११-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अडगाव (ता.तेल्हारा, जि.अकोला) येथे पोलिसांनी छापा टाकून चॉकलेटच्या पाकिटातून तस्करी होत असलेला १४६ किलो गांजा जप्त केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोट व तेल्हारा तालुक्यात गांजाची तस्करी करणारी टोळी कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांनी किती जणांना अटक केली व पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०३-०३-२०२१) :** (१) सदर छापा कारवाई ही ग्राम अडगाव खुर्द ता. अकोट जि. अकोला आणि ग्राम बोरव्हा ता. तेल्हारा जि. अकोला येथील आहे. माहे सप्टेंबर २०२० मधील या दोन्ही ठिकाणावरील छापा कारवाईमध्ये एकूण १४६ किलो ९०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे.

(२) अकोट व तेल्हारा तालुक्यात गांजाची तस्करी करणारी टोळी सक्रीय असल्याचे निदर्शनास आल्यावरुन २ आरोपींना अटक करण्यात आली असुन १ आरोपी सद्यस्थितीत फरार आहे. तपासादरम्यान नमुद अरोपींची गुन्हेगारी पार्श्वभुमी तपासली असता नमुद आरोपी यांच्यावर यापुर्वी अंमली पदार्थ तस्करीच्या गुन्ह्यांची नोंद आढळुन आली नाही.

(३) सदर प्रकरणी एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ कलम ८ (अ) (३), २०(ब) (२)(ग) अन्वये २ आरोपीतांना अटक करण्यात आली असून १ आरोपी फरार आहे. गुन्ह्यांचा तपास पुर्ण झाला असून आरोपी यांचेविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले असून गुन्हा सद्यास्थितीत मा. न्यायालयात न्यायदानाकरिता प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हातील झील एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या इतर संस्थांनी शिष्यवृत्तीमध्ये केलेला गैरव्यवहार

**(४१) १८४२४ (२१-११-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील झील एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या झील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि रिसर्च, नऱ्हे, झील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि कॉम्प्यूटर ॲप्लिकेशन, नऱ्हे, झील इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन संगणक ॲप्लिकेशन आणि रिसर्च सेंटर, नऱ्हे, पुणे यांनी बोगस विद्यार्थी, शैक्षणिक शुल्क, शालेय प्रवेश व तदनुषंगिक बाबींतील शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार करून शासनाची फसवणूक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिष्यवृत्ती गैरव्यवहार प्रकरणी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, विभाग, पुणे यांनी दिनांक २० जुलै, २०२० रोजी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना उपरोक्त संस्थेवर शिस्तभंगाची कारवाई करून काळ्या यादीत टाकण्याबाबत पत्रव्यवहार देखील केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी पत्र क्र. २५८५२, दिनांक १६ डिसेंबर, २०१९ अन्वये सहआयुक्त (शिक्षण) समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे यांना केलेल्या पत्रव्यवहारात सदर प्रकरणी कारवाईस झालेल्या विलंबामुळे कारणे दाखवा नोटीस देखील बजावली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून काय आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२७-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे
(२) होय, हे खरे आहे
(३) होय, हे खरे आहे
(४) झील एज्युकेशन सोसायटीच्या अधिनस्थ असलेल्या पाचही महाविद्यालयांचे सन २००९-१० ते सन २०११-१२ या कालावधीतील शिष्यवृत्ती वाटपातील अंतिम मुल्यनिर्धारण सहाय्यक संचालक, लेखा परिक्षण, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे यांचे मार्फत करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे यांना आयुक्तालयामार्फत देण्यात आलेल्या आहेत. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**मौजे भोलावडे, येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधण्यास निधी मिळणेबाबत.**

**(४२) १८४८८ (१९-११-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भोलावड (ता.भोर, जि.पुणे) येथील गट क्र.६१० मधील जागेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांची राहण्याची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी २०० बेडचे वसतीगृह बांधण्यास निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री यांना दिनांक १९ फेब्रुवारी, २०२० व दिनांक २७ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी २०० बेडचे वसतीगृहास त्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१४-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
सदर ठिकाणी ७५ विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह भाडेतत्वावर सुरू आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मौजे भोलावडे, ता.भोर जि. पुणे येथील गट क्र.६१० मधील जागेमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी २०० विद्यार्थी क्षमतेच्या वसतिगृहास निधी उपलब्धतेसह प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आली असून याबाबतचा प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**हातगाव (ता. दारव्हा, जि.यवतमाळ) येथे पाणी पुरवठा**
**विहीरीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४३) १८६०१ (१९-११-२०२०). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातगाव (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथे पाणी पुरवठयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता विहीरीचे बांधकाम व पाईपलाईन अशा विविध कामांचा समावेश करुन या कामांकरीता खनिज विकास निधीतून सुमारे १९ लाख ४६ हजार ७१७ रुपयांस मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हातगाव येथे जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभागांतर्गत विहिरींच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याची तक्रार प्राप्त झाली असून तसेच सदर काम नियमानुसार होत नसल्याचे निदर्शनास आल्याने कनिष्ठ अभियंत्याच्या मोका पाहणी अहवालावरुन उपअभियंत्यांनी दिनांक. १९ जून २०२० रोजी वा त्यासुमारास कंत्राटदाराला पत्राद्वारे कळविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बांधकामात आवश्यक अंतरावर लोखंड बांधणी व ओव्हरलॅपिंग होत नसून, रेतीऐवजी डस्टचा वापर होत आहे. याबाबत कंत्राटदारावर कोणतीही कारवाई न करता उप अभियंत्यांनी कनिष्ठ अभियंत्याच्या संगनमताने सदर काम त्यांच्याच स्तरावर नियमित केल्याचे दिसून येते हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०१-२०२१) :** (१) खाणबाधित क्षेत्रातील प्राप्त प्रस्तावामधील मौज हातगाव ता. दारव्हा, जि. यवतमाळ येथील पाणीपुरवठा योजनेचे रु. २१.१८ लक्ष किंमतीच्या प्रस्तावाचा समावेश आहे. सदर प्रस्तावाला दि. १५.०७.२०१९ रोजी प्रशासकिय मान्यता देण्यात आली असून कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद यवतमाळ यांना कळविण्यात आले आहे.

(२) सदर योजनेतील विहिरीचे काम प्रगतीपथावर असताना संबंधितांना कामाच्या मोका पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटीची पुर्तता करुन काम योग्य मानांकनाप्रमाणे पुर्ण करुन घेण्याबाबत संबंधित कंत्राटदारास दि. ११.०६.२०२० रोजीच्या पत्रान्वये सुचित करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही. सदर योजनेच्या विहिरीच्या बांधकामामध्ये डस्टचा वापर करण्यात आलेला नसून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निदेशानुसार योजनेच्या उर्ध्व वाहिनीवरील नाला व रस्ता क्रॉसिंग करीता करावयाच्या क्रॉक्रिटमध्ये २० टक्के क्रशर सॅण्ड चा वापर करण्यात आला आहे. विहिर बांधकामासाठी रेतीचाच वापर करण्यात आलेला असून, वापरण्यात आलेल्या सर्व साहित्याचे शासकिय प्रयोगशाळेतून तपासणी करण्यात आलेले आहे व कॉक्रिट नमुन्याची चाचणी सुध्दा योग्य आढळली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

**बुलढाणा जिल्ह्यातील आंतरजातीय विवाह केलेल्या दाम्पत्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत**

**(४४) १८८८७ (२१-११-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील आंतरजातीय विवाह केलेल्या दाम्पत्यांना सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात प्रोत्साहनपर अनुदान मिळाले नसल्याचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेस केंद्र शासनाकडून ५० टक्के व राज्य शासनाकडून ५० टक्के निधी मिळाल्यानंतर सदरहू अनुदान दिले जाते परंतू केंद्र शासनाकडून अद्यापही निधी प्राप्त झाला नसल्यामुळे अनुदान देण्यास दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केंद्र शासनाकडून ५० टक्के निधी मिळण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करुन लाभार्थ्यांना तात्काळ प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१३-०१-२०२१) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) आंतरजातिय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना ही योजना केंद्र पुरस्कृत असून या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून ५०:५० टक्के या प्रमाणात निधी प्राप्त होतो. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याशिवाय राज्य शासनाकडून राज्य समरूप हिस्सा वितरीत करता येत नाही. यास्तव सदर योजनेंतर्गत केंद्र हिस्सा प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सबब या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून ५०% केंद्र हिस्सा प्राप्त होताच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील रमाई घरकुल योजनेमधील घरकुल बांधकामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४५) १९१९० (१९-११-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील सन २०१९ करीता मंजुर रमाई घरकुल योजनेमधील घरकुल बांधकामांपैकी काही गावांना पहिला तर काही गावांना दुसरा हप्ता देण्यात आला असून, उर्वरित हप्ते १० महिन्याचा कालावधी उलटून देखील अदा करण्यात आले नसल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी घरकुल बांधकामास मिळणारा निधी विलंबाने प्राप्त होत असल्याने अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन रमाई घरकुल योजनेतंर्गत घरकुल बांधकामांना मंजुर निधी त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१४-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेली रू.५००.०० कोटी इतक्या निधीतून कोविड-१९ ची परिस्थितीचा विचार करता वित्त विभागाने या योजनेकरीता रू.४००.०० कोटी इतका निधी वर्ग करण्यात आला असून सदरील निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच, या योजनेसाठी तातडीची बाब म्हणून डिसेंबर, २०२० च्या हिवाळीअधिवेशनात रू.५००.०० कोटी (अक्षरी रूपये पाचशे कोटी फक्त) इतका निधी पुरक मागणीव्दारे उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वडाळा (ता.आष्टी,जि.वर्धा) येथील पुनर्मौजणी केलेल्या शेतीचा बंदोबस्त नकाशामध्ये शेतात जाण्याकरिता रस्ता दर्शविला नसल्याबाबत**

**(४६) २०२६६ (२८-०१-२०२१). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वडाळा (ता.आष्टी,जि.वर्धा) येथील अप्पर वर्धा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात न गेलेल्या शेत सर्व्हे क्र. १४३/१, १४३/२, १४४/१, १३६, १३५, १३४, १३३/१ या शेतांच्या नकाशामध्ये शेतात जाण्याकरिता रस्ता दर्शविण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या जमीनीची पुनर्मोजणी करण्यात आलेल्या बंदोबस्त नकाशामध्ये शेती वाहतुकीकरिता असलेल्या नोंदी नकाशामध्ये दिसत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनीधींनी दिनांक ३१ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास सहसंचालक भुमी अभीलेख कार्यालय, नागपूर यांना पत्र देवून कळविले असतांनाही ५ महिन्यांचा कालावधी उलटूनही कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने मौजे वडाळा येथील शेतकऱ्यांच्या शेतीच्या बंदोबस्त नकाशामध्ये दुरूस्ती करून कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०३-०३-२०२१) :** (१), (२), (३), (४) व ५
मौजा वडाळा ता. आष्टी या गावाचे मुळ बंदोबस्त १९३२-३३ साली झालेले आहे. या गावाचे शेत सर्वे क्र. १४३/१, १४३/२, १४४, १३६, १३५, १३४ व १३३/१ मध्ये शेतात जाण्याबाबतचा रस्ता तुटक रेषेने दर्शविण्यात आलेला आहे. तदनंतर मौजा वडाळा या गावाला पुनर्मोजणी योजना लागून २९/०२/२००० ला प्रख्यापन होऊन या योजनेप्रमाणे अधिकार अभिलेख अंमलात आहे. पूनर्मोजणी योजनेतील नकाशामध्ये बंदोबस्त सर्वे नंबरला भूमापन क्रमांक ९१, ९३, ९४, ९५, ९६, ९७, ९८,९९ व १०२ कायम करण्यात आलेले आहे. या सर्वे नंबर नकाशाचे अवलोकन केले असता रस्त्याच्या खुणा दर्शविण्यात आलेल्या नाहीत.

उपसंचालक भूमी अभिलेख, नागपूर प्रदेश नागपूर यांचे कार्यालयाकडून दिनांक ०७/१२/२०२० रोजी चे पत्र जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयास दिनांक १०/१२/२०२० रोजी प्राप्त होऊन उप अधिक्षक भूमी अभिलेख आष्टी यांना दिनांक १५/१२/२०२० चे पत्रानुसार

पुढील कार्यवाही करण्याकरिता पाठविण्यात आले होते. परंतु कोविड - १९ चे प्रादूर्भाव मध्ये पॉझीटीव्ह रूग्णांच्या संपर्कात कार्यालयीन कर्मचारी आल्याने व ते क्वारंटाईन असल्याने सदरची दुरूस्ती करीता स्थळ निरिक्षण दिनांक ०४/०२/२०२१ ला करण्यात आले आहे. त्यानुसार मूळ बंदोबस्त नकाशाची खात्री करून पुनर्मोजणी भू. क्र. ९१,९३,९४,९५,९६,९७,९८,९९ व १०२ मध्ये बंदोबस्त नकाशाप्रमाणे रस्त्याच्या खुणा कायम करणेबाबतचा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६, १३५, १५५ नूसार दुरुस्ती प्रस्ताव जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, वर्धा यांनी उपविभागीय अधिकारी, आर्वी यांना दि.०५.०२.२०२१ चे पत्रान्वये पाठविण्यात आलेला आहे.

---

**रायगड जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ कर्जतचे उपअभियंता यांनी असत्य व दिशाभूल करणारी माहिती दिल्याबाबत**

**(४७) २०३०६ (२८-१२-२०२०). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ कर्जतचे उपअभियंता श्री.सर्वगोड यांनी "सार्वजनिक बांधकाम विभागातील उल्लेखनिय कामगिरी बाबत" सन २०१९ करीता देण्यात येणा-या वैयक्तिक पुरस्कारासाठी मुख्य अभियंता यांचेमार्फत शासनास खोटी व दिशाभूल करणारी लेखी माहीती देवुन शासनाची फसवणूक करुन प्राप्त करुन घेतलेला पुरस्कार रद्द करण्याचा प्रस्ताव पुराव्यासह क्षेत्रीय स्तरावरील वरिष्ठ अधिका-यांनी माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार उपअभियंता श्री.सर्वगोड यांना देण्यात आलेला पुरस्कार रद्द करणे, शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना बडतर्फ करणे तसेच त्यांची खाते निहाय चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०९-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या अहवालावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयात अतिवृष्टीमुळे भात शेतीचे व फळ बागायतदारांचे झालेले नुकसान**

**(४८) २०३१२ (१५-०१-२०२१). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात माहे जुलै, २०२० ते ऑक्टोबर, २०२० या कालावधील झालेल्या अतिवृष्टीमुळे भात शेतीचे व फळ बागायतदारांचे नुकसान झाल्याबाबत प्रशासनाकडून नुकसानभरपाई त्वरित मिळावी म्हणून पालघर जिल्हयातील लोकप्रतिनिधीनी कृषी मंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतपिकांचे व फळ बागाचे कृषी विभागांने पंचनामे केले आहेत काय,

(३) असल्यास, पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (२३-०२-२०२१) :** (१) व (२) होय.
(३) दिनांक ०९.११.२०२० व दिनांक ०७.०१.२०२१ रोजी पालघर जिल्ह्यासाठी दोन हप्त्यात रू.२७२७.६९ लक्ष इतका मदत निधी विभागीय आयुक्त, कोकण यांच्या मार्फत जिल्हाधिकारी, पालघर यांना वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे दापचेरी (ता. डहाणू जि. पालघर ) येथे आदिवासी विकास संकुल उभारण्याबाबत**

**(४९) २०३१३ (१५-०१-२०२१). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दापचेरी (ता. डहाणू, जि. पालघर) येथे आदिवासी विकास संकुल उभारण्याचा प्रस्ताव असून दुध डेरीच्या ६०० एकर जमीन पैकी १० एकर जमीन घेण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमिनीवर आदिवासी मुलामुलींचे ०३ वसतिगृह तसेच आदिवासी मुलामुलींकरिता इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा, शासकीय वसतिगृह, जनते करीता सांस्कृतिक भवन व आदिवासी प्रकल्प कार्यालय उभारण्याची मागणी करण्यात आली असून उक्त कामाबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्प तातडीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२२-०२-२०२१) :** (१) (२) व (३) अशंत: खरे आहे.

डहाणू प्रकल्पांतर्गत मंजूर असलेली एकलव्य निवासी इंग्रजी शाळा व आदिवासी संकुल यासाठी कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय विभागाच्या अधिपत्याखालील मौजे दापचेरी येथील शासकीय जागा मिळण्यासाठी कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय विभागाकडे दिनांक २० जानेवारी २०२१ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

आदिवासी शासकीय वसतिगृह डहाणू येथील विद्यार्थी हे डहाणू येथील शैक्षणिक संस्थेच्या महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत. डहाणू ते दापचेरी हे अंतर अंदाजे ३० कि.मी असल्याने त्यांना ये-जा करणे गैरसोईचे आहे. त्यामुळे सदर वसतिगृह डहाणू येथे करण्यासाठी प्रकल्प कार्यालयाकडून पर्यायी जागेचा शोध घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना अनुदान मिळणेबाबत**

**(५०) २०३५६ (१५-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गोर गरीब विधवा परितक्त्या महिला व जेष्ठ नागरिकांकरिता शासनाकडून संजय गांधी निराधार सर्वसाधारण, संजय गांधी निराधार अनुसूचित जाती, श्रावण बाळ, इंदिरा गांधी वृद्धापकाळ, इंदिरा गांधी दिव्यांग योजना या अनेक वर्षापासून राबविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील सर्वाधिक लाभार्थी असलेल्या निराधार योजनेतील सर्वसाधारण गटातील नागरिकांना माहे ऑगस्ट, २०२० ते ऑक्टोबर, २०२० या तीन महिन्याचे अनुदान मिळाले नसल्याने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून थकीत अनुदान देण्याबाबतच्या मागणीचे पत्र संबंधित विभागाला पाठविण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३).असल्यास, कोरोनाच्या काळात रोजगार उपलब्ध नसताना गोर गरीब नागरिकांना विविध निराधार योजनेंचा मागील तीन महिन्यापासून अनुदानाचा लाभ मिळत नसल्याने त्यांना उपासमारी व आर्थिक अडचणीना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेळेत अनुदान वितरीत करण्यास जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांचेवर कारवाई करुन पिंपरी-चिंचवड शहरातील संजय गांधी निराधार योजनेतील सर्वसाधारणगटातील लाभार्थ्यांना तीन महिन्याचे थकीत अनुदान तात्काळ मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. धनंजय मुंडे (२६-०२-२०२१) :** (१)हे खरे आहे.

(२), (३) व (४) संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील सर्वसाधारण लाभार्थ्यांकरिता माहे, ऑक्टोबर, २०२० ते मार्च, २०२१ या कालावधीसाठी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना शासनाच्या दिनांक १०/११/२०२० व दिनांक २५/०१/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.